दैनिक
सिंहवाणी वृत्त
प्रखर लेखणीचा साक्षीदार

संपादक (विकास) : श्याम पेठकर | संचालक-संपादक : अजय बिवडे

Reg. No : MHBIL/25/A4140 | Mail Id : sinhvanivrutta@gmail.com | दिनांक : मंगळवार, १० नोव्हेंबर २०२६ | Epaper : epaper.sinhvani.com | पृष्ठे : ४ | वर्ष : १ | अंक : ३३० | किंमत : २ रूपये

बलिप्रतिपदा निमित्त हार्दिक शुभेच्छा

सर्व प्रकारची प्रिंटींग अगदी कमी दरात...
नागपूरातून अत्याधुनिक छपाई मशीनव्दारे कमी दरात सर्व प्रकारची प्रिंटींग करण्याची सुवर्णसंधी...
- आजच संपर्क करा -
८६९८७८८६६६
९६५७२३२०२६

अग्नितांडवाने धाराशिवमधील एकाच कुटुंबातील ६ जणांचा मृत्यू

वृत्तसंस्था, धाराशिव

धाराशिव जिल्ह्यातील येडशी गावात काल (८ नोव्हेंबर) मध्यरात्री घडलेल्या भीषण अग्नितांडवाने संपूर्ण गाव सुन्न झालंय. या दुर्घटनेत एकाच कुटुंबातील सहाही जणांचा गुदमरून दुर्दैवी मृत्यू झाला. तर एक जण या आगीतून बचावला आहे. या कुटुंबातील सिद्धी आणि गायत्री दोन मुली शिक्षणासाठी बाहेरगावी राहत होत्या. एक मुलगी पुण्यात, तर दुसरी धाराशिवमध्ये शिक्षण घेत होती.

दिवाळीचा सण असल्याने दोघीही आपल्या कुटुंबासोबत सण साजरा करण्यासाठी गावी आल्या होत्या. मात्र ज्या दिवाळीच्या आनंदासाठी संपूर्ण कुटुंब एकत्र आलं होतं, त्याच दिवाळीत काळाने या कुटुंबावर घाला घातला. सदर घटनेनंतर संपूर्ण महाराष्ट्रभर एकच हळहळ व्यक्त होत आहे.

पहिल्यादा घटनास्थळी पोहोचलेली आणि वाचवण्यासाठी धडपडणाऱ्या माणसांनी थरारक घटनेची माहिती दिली. दुकानाच्या बाहेरच्या बाजूला सुरुवातीला आग लागली असल्याचं प्रथम दर्शनीने सांगितलं. आगीचा विळख्याने घराचा बाहेर पडण्याचा दरवाजा ब्लॉक झाला. समोरच्या बाजूला आगीचा भडका एवढा होता की नारळाचे आणि पिंपळाचे झाड देखील शेंड्यापर्यंत जळाले, अशी माहिती प्रत्यक्षदर्शीने दिली. पहिल्या मजल्यावर झोपलेल्या दोघांचा जळून मृत्यू झाला.



अक्षरशः त्यांचे पाय देखील मृतदेहापासून वेगळे झाले. तर वरच्या मजल्यावर असणाऱ्या चौघांचा गुदमरून मृत्यू झाला. किराणा दुकान कॉस्मेटिक दुकान आणि कपड्याचे दुकान जळून खाक झाले. कॉस्मेटिकच्या धुरामध्ये विषारी धुर मिसळल्याने गुदमरून मृत्यू झाला असावा असा अंदाज आहे.

जेसीबीच्या सहाय्याने भिंती फोडून गावकऱ्यांनी धूर बाजूला करण्याचा प्रयत्न केला. हातोड्याने भिंती फोडल्या. सुरुवातीला आतून वाचवण्यासाठी आवाज येत होता. मात्र त्यानंतर आवाज बंद झाला आणि सहा जणांचा दुर्दैवी मृत्यू झाला, असं अंगावर काटा आणणारा प्रसंग स्थानिक गावकऱ्यांनी सांगितला. सदर आगाची घटना घडल्यानंतर अग्निशमन दल वेळेवर पोहोचले नाही. तसेच अग्निशामक दलाकडे त्यांची साधनसामग्री देखील नव्हती. अग्निशामक दलाच्या गाडीमध्ये पाणी आणि डिझेलही नव्हतं, अशी धक्कादायक माहिती समोर आली आहे. अग्निशामक दलाच्या गाडीमध्ये डिझेल पुरेसं नव्हतं. त्यामुळे रात्री डिझेल येडशीत आल्यावर भरायला लागले.

पाणी भरण्यासाठी आणि डिझेल भरण्यासाठी वेळ गेला आणि त्यामुळे कुटुंबाला वाचवण्यात यश आलं नाही. गाडी वेळेवर आली असती तर तीन ते चार लोकांचा जीव वाचवता आला असता, असा संताप गावकऱ्यांनी व्यक्त केला. किराणा दुकानाच्यावरच्या मजल्यावर कुटुंब राहत होते. त्यामुळे आगीतून बाहेर पडू न शकल्याने गुदमरून मृत्यू झाला. ध्यरात्रीपासून गावकरी आणि अग्निशामक दलाकडून आग विझवण्याचे शर्तीचे प्रयत्न सुरु होते. मात्र आगीने रौद्र रूप घेतल्याने दुर्दैवी मृत्यू झाला. धाराशिव शासकीय रुग्णालयात मृत अवस्थेत सगळ्यांना दाखल केल्याची डॉक्टरांची माहिती आहे. दिवाळीनिमित्त घरात लावलेल्या पणतीमुळे आग लागली असल्याची प्राथमिक माहिती समोर येत आहे. आगीचे ठोस कारण अद्याप समजू शकलेलं नाही.

थोडक्यात

कर्करोगाची १३७ औषधी स्वस्त

नवी दिल्ली : भारत सरकारने कर्करोगाच्या रुग्णांना मोठा दिलासा दिला आहे. कर्करोगाच्या १३७ औषधांच्या किमती कमी करण्यात आल्या आहेत. या नवीन किमती आज ९ नोव्हेंबरपासून लागू करण्यात आल्या. एनपीपीएने या १३७ कर्करोगविरोधी औषधांसाठी व्यापार नफ्याची मर्यादा निश्चित केली. या किमती सुमारे ५० टक्क्यांनी कमी करण्यात आल्या आहेत. ५० हजार रुपये किमतीचे औषध आता फक्त २५ हजार रुपयांना उपलब्ध झाले आहे. राष्ट्रीय औषध किंमत प्राधिकरणाने दिलेल्या माहितीनुसार आज ९ नोव्हेंबरपासून नवीन किमती लागू करण्यात आल्या. ८५ औषध कंपन्यांनी १३६४ कर्करोगविरोधी औषधांच्या सुधारित किमती जाहीर केल्या. या माहितीनुसार ६७९ ब्रँड्सच्या किमती ५० टक्क्यांहून अधिक कमी करण्यात आल्या आहेत तर काही औषधांच्या किमतीत तब्बल ९६.४५ टक्क्यांची कपात झाली. एका अंदाजानुसार १ लाख रुपये किमतीचे कर्करोगाचे औषध आता फक्त ४ हजार रुपयांना उपलब्ध होईल. औषधांच्या किमतीतील कपातीमुळे रुग्णांची वार्षिक अंदाजे ३,५४०.३८ कोटींची बचत होण्याचा अंदाज आहे. कमी झालेल्या किमतीत औषधे खरेदी करण्याबाबत जागरूक राहण्यासाठी आणि आपल्या औषधांच्या यादीची तपासणी करण्यासाठी रुग्णांना मार्गदर्शक सूचनाही देण्यात आल्या आहेत. आजपासून रुग्ण फार्मा सही दाम ॲप आणि एनपीपीएच्या वेबसाइटवर नवीन किमती तपासू शकतात.

दिवाळीच्या सणात अमरावतीत रक्तरंजित घटना, तरुणाला भोसकून संपवले

दै. सिंहवाणी वृत्त, अमरावती

अमरावती शहरातून एक अतिशय खळबळजनक बातमी समोर आली आहे. दिवाळीच्या सणात अमरावतीत रक्तरंजित घटना घडली आहे. गाडगेनगर हद्दीत तरुणाची चाकूने वार करून हत्या करण्यात आली आहे. अमरावती शहरात दिवाळीचा सण साजरा होत असतानाच गाडगेनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत तरुणाची धारदार शस्त्राने वार करून हत्या झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. यातील मृत तरुणाचे नाव राजेंद्र कचरे असे आहे. या घटनेनं शहरात मोठी खळबळ उडाली असून सध्या पोलीस या घटनेचा अधिक तपास करत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, महेंद्र कॉलनी येथील पांढरी हनुमान मैदानावर काही अज्ञात हल्लेखोरांनी निक्कू याच्यावर धारदार शस्त्राने हल्ला केला. या हल्ल्यात तो गंभीर जखमी झाला. त्याला तातडीने जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल करण्यात आले. प्रकृती चिंताजनक असल्याने पुढील उपचारासाठी खासगी रुग्णालयात हलविण्यात आले. मात्र, उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला. दरम्यान या घटनेतील आरोपी कोण? हत्येमागील नेमके कारण काय? याचा तपास सध्या पोलीस करत असून आरोपीला शोधून काढणं पोलिसांपुढचं आव्हान असणार आहे.आई वडिलांसह शेतात भातपीक कापणी करीत असताना झुडुपात दबा धरून बसलेल्या वाघानं तरुणावर झडप घालून त्याचा जीव घेतला. ही घटना भंडारा जिल्ह्यातील साकोली तालुक्यातील ब्राम्हणी गावातील शेतशिवात घडली. कुणाल युईके असं वाघाच्या हल्ल्यात ठार झालेल्या २६ वर्षीय तरुणाचं नावं आहे. भेल प्रकल्पासाठी अधिग्रहित केलेल्या जागेच्या मागं हे गावं असून मृत तरुण आई वडिलांसह भातपीक कापणीला शेतात गेला होता.

काशीला अंत्यसंस्कारासाठी निघालेल्यांवर काळाचा घाला



काशी : एका नातेवाईकाच्या मृत्यूनंतर त्याच्यावर अंत्यसंस्कार करण्यासाठी बिहारहून काशीला निघालेल्या कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. प्रवासादरम्यान हजारीबाग येथील चौपारणमधील दनुआजवळ एका भरधाव ट्रकने त्यांच्या वाहनाला जोरदार धडक दिली. या भीषण अपघातात ७ जणांचा मृत्यू झाला, तर १४ जण गंभीर जखमी झाले आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, बिहारमधील बगोदर परिसरातील बियौरो टांड येथून काही लोक एका नातेवाईकाचा मृतदेह घेऊन काशीला अंत्यसंस्कारासाठी निघाले होते. वाहनाच्या आत इतर नातेवाईक बसले होते. दरम्यान प्रवासात काही प्रवाशांना थांबायचं असल्याने चालकाने वाहन रस्त्याच्या कडेला घेण्याचा प्रयत्न केला. त्याच वेळी मागून भरधाव वेगाने आलेल्या एका ट्रकने या वाहनाला जोरदार धडक दिली. अपघातानंतर घटनास्थळी एकच गोंधळ उडाला आणि आरडाओरडा झाला. स्थानिक नागरिकांनी तातडीने धाव घेत पोलिसांच्या मदतीने जखमींना चौपारण येथील सामुदायिक आरोग्य केंद्रात दाखल केले. तिथे उपचारादरम्यान ७ जणांच्या मृत्यूची पुष्टी करण्यात आली.

'ई-फेरफार'द्वारे होणार आता पीक पाहणी

पीक नोंदणीतील तांत्रिक व भौगोलिक अडचणी टाळण्यासाठी देवेंद्र फडणवीस सरकारचा निर्णय, महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचा पुढाकार

दै. सिंहवाणी वृत्त, मुंबई



तांत्रिक व भौगोलिक अडचणींमुळे खरिपाची ऑनलाईन पीक नोंदणी जिथे शक्य होत नाही, तिथे आता 'ई-फेरफार'द्वारे पीक पाहणी करण्याचा निर्णय फडणवीस सरकारने घेतला आहे. राज्यातील लाखो शेतकऱ्यांना यामुळे दिलासा मिळाला आहे. महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी या निर्णयासाठी आग्रही भूमिका घेतली होती. महसूल विभागाने याबाबतचे परिपत्रक जारी केले.

केंद्र शासनाच्या 'डिजिटल क्रॉप सर्व्हे' मोबाईल ॲपमध्ये शेतातील गटांचे अंतर अधिक दर्शविणे, गावांचे नकाशे परस्पर बदलणे किंवा काही गावांचे नकाशे व गट क्रमांक उपलब्ध नसणे यांसारख्या तांत्रिक व भौगोलिक अडचणी येत आहेत. अशा त्रुटींमुळे शेतकऱ्यांची पीक नोंदणी प्रलंबित राहू नये, म्हणून चालू खरीप हंगामाकरिता 'ई-फेरफार' प्रणालीद्वारे तलाठी स्तरावर पीक पाहणीची पर्यायी व्यवस्था उपलब्ध करून देण्यात आली आहे. जमाबंदी आयुक्त व संचालक, भूमि अभिलेख (पुणे) यांना याबाबतचे निर्देश देण्यात आले आहेत.

महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले, तांत्रिक व भौगोलिक अडचणींमुळे शेतकऱ्यांच्या पिकांची ऑनलाईन नोंदणी रखडू नये आणि त्यांना कोणतीही अडचण येऊ नये, यासाठी शासनाने 'ई-फेरफार' प्रणालीद्वारे पीक पाहणीची पर्यायी व्यवस्था उपलब्ध करून दिली आहे. महसूल यंत्रणेने या प्रक्रियेत कोणतीही दिरंगाई न करता शेतकऱ्यांना तातडीने दिलासा द्यावा."

दिवाळसणाला गालबोट, नागपुरातील देवनगरात युवकाची हत्या

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर



मित्रांसोबत वाढदिवसाच्या कार्यक्रमाला गेलेल्या तरुणाची कुख्यात गुंड आणि साथीदारांनी क्षुल्लक कारणावरून निर्घृण हत्या केली. बजाजनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत रविवारी, ८ नोव्हेंबर रोजी रात्री, ऐन दिवाळीच्या दिवशी ही थरारक घटना घडली. अमन ऊर्फ बॉबी सुनील सपाटे (२७, रा. पिपळा फाटा, हुडकेश्वर) असे मृताचे नाव आहे.अक्षय मडावी असे या गुन्ह्यातील आरोपीचे नाव आहे. देवनगरमधील प्रसाद राऊत नामक तरुणाचा ९ नोव्हेंबरला बर्थ डे असल्यामुळे रविवारी मध्यरात्री त्याच्या घराजवळ केक कापण्याचा मित्रांनी प्लान केला होता.

त्यानुसार, ४० ते ५० तरुण रविवारी मध्यरात्री राऊतच्या घराजवळ गोळा झाले. त्यात अमन उर्फ बॉबी आणि अक्षय गंगाधर नौकरकर (३१, रा.बजाजनगर) हे देखील गेले होते.चौकातील ज्यूस दुकानासमोर त्यांनी कार उभी केली. कारसमोर आरोपी फटाके फोडत असल्यामुळे बॉबीने त्यांना बाजुला फटाके फोडा, असे सांगितले. त्याचा राग आल्याने आरोपींनी आधी त्याला कारमध्येच झापडा लगावल्या. नंतर खुनशी स्वभावाच्या आरोपी अक्षय मडावी आणि साथीदारांनी संगनमत करून बॉबीच्या पोटावर चाकूने वार करून त्याला गंभीर जखमी केले.

बॉबी रक्ताच्या थारोळ्यात कोसळला असताना 'भाई भाई' म्हणारे सर्वच्या सर्व मित्र तेथून पळून गेले. त्याला वाचविण्यासाठी बाजुला असलेले बंटी आणि इतर दोन-तीन मित्र धावपळ करू लागले. त्यांनी त्याला ऑरेंज सिटी हॉस्पिटलमध्ये नेले. मात्र, बराच वेळ झाल्यानंतर सर्जन नसल्याचे कळले. त्यानंतर मित्रांनी त्याला धंतोलीच्या हॉस्पिटलमध्ये नेले. तोपर्यंत मोठ्या प्रमाणात रक्तस्त्राव झाल्याने बॉबीने जीव सोडला. मृत बॉबी हा अत्यंत मनमिळावू स्वभावाचा होता. निकटवर्तीयांनी दिलेल्या माहितीनुसार, त्याची आई सारिका राजस्थानमध्ये राहाते, तर तो येथे एका खासगी आस्थापनेत काम करायचा. हे करतानाच तो स्वतःचे शिक्षणही करीत होता. त्याला बहिण तणू तसेच डिम्पल आणि एक लहान भाऊ आहे. घरात तोच कर्ता म्हणून जबाबदारी सांभाळत होता. त्याचा असा घात झाल्याने त्याच्या कुटुंबियांसाठी ही दिवाळी अंधार पेरणारी ठरली आहे.

नौकरकर यांच्या तक्रारीवरून बजाजनगर पोलिसांनी आरोपींविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम १०३(१), ३(५) अन्वये गुन्हा दाखल केला आहे. दरम्यान, रेकॉर्डवरचा आरोपी असताना त्याच्यावर बजाजनगर पोलिसांचे लक्ष कसे नव्हते? असा प्रश्न आहे. आरोपी मडावी हा कुख्यात गुन्हेगार असून, त्याच्याविरुद्ध तब्बल २२ गंभीर गुन्हे दाखल असल्याचे समजते. बजाजनगर आणि प्रतापनगर ठाण्यातील काही कर्मचाऱ्यांसोबत त्याची सलगी असल्याने तो मोकाट सुटला होता. ऐन दिवाळीच्या दिवशी तो जवळ घातक शस्त्र घेऊन फिरत होता, त्यावरून त्याला पोलिसांचा धाक नसल्याचे स्पष्ट होते.

या निर्ढावलेपणामुळेच त्याने एका सुस्वभावी आणि गरिब कुटुंबातील तरुणाचा अशा पद्धतीने जीव घेतला. आरोपीच्या या मोकाट वर्तनाला कोण पोलिस जबाबदार आहेत? त्यांच्यावरही कडक कारवाई व्हावी, अशी मागणी पुढे आली आहे. हत्येची ही घटना घडल्यानंतर बजाजनगरचे ठाणेदार चेतन चव्हाण यांनी मृताच्या नातेवाईकांसोबत अतिशय संवेदनाहिन व्यवहार केल्याची तक्रार आहे. मृत बॉबीच्या बहिणीसह मित्रांनी या घटनेत अनेक आरोपी असल्याचे सांगितले असता त्यांनी त्याची दखल घेतली नसल्याचाही आरोप आहे.

ठाणेदार चव्हाण यांचे वर्तन बघून नातेवाईकांनी सोमवारी पोलिस आयुक्त विश्वास नांगरे पाटील यांच्याकडे तक्रार केली. त्याची गंभीर दखल घेऊन पोलिस आयुक्तांनी ठाणेदार चव्हाण यांची तकडाफडकी उचलबांगडी केली. त्यांना नियंत्रण कक्षात संलग्न करण्यात आले.



संपादकीय लेखणीतून...

शहरीकरण: नागरीकांच्या मुलभूत गरजांचे नियोजन

शाश्वत, सुरक्षित आणि राहण्यायोग्य समुदाय तयार करण्यात नगर नियोजनाच्या महत्त्वाला प्रोत्साहन देणे आणि व्यावसायिक नियोजनाचा योगदानाचा सन्मान करणे हा या दिवसाचा मूळ उद्देश आहे.या दिवसाची सुरुवात १९४९ मध्ये अर्जेंटिनामधील ब्युनोस आयर्स विद्यापीठाचे प्राध्यापक कार्लोस मारिया डेला पाओलेरा यांनी केली होती. आज हा दिवस चार खंडांवरील ३० हून अधिक देशांमध्ये मोठ्या प्रमाणावर साजरा केला जातो. प्रा. पाओलेरा यांनी या दिवसासाठी एक खास ध्वज डिझाइन केला होता; ज्याच्या वरच्या अर्ध्या भागात "निळा" रंग (आकाश दर्शवणारा) आणि खालच्या अर्ध्या भागात "हिरवा" रंग (जमीन/निसर्ग दर्शवणारा) असून मध्यभागी सोनेरी रंगाचा सूर्य आहे.

शहरी समस्यांवर चर्चा: झोपडपट्टी विकास, वाढते प्रदूषण, वाहतूक कोंडी, अपुरी घरे आणि पाण्याची कमतरता यांसारख्या शहरी समस्यांवर योग्य मार्ग काढण्यासाठी चर्चासत्रे व परिषदांचे आयोजन केले जाते. काँक्रीटच्या जंगलात हरवत चाललेला निसर्ग आणि हरित शहरांची निर्मिती कशी करावी, याचे महत्त्व नागरिकांना व प्रशासनाला पटवून दिले जाते. यादरम्यान स्थानिक स्वराज्य संस्था, नगररचनाकार आणि नागरिक शहराच्या विकासात कशा प्रकारे सहभाग घेऊ शकतात याचे प्रबोधन केले जाते. शहरांची किंवा वस्त्यांची रचना, विकास आणि व्यवस्थापन शास्त्रीय पद्धतीने करणे होय. यामध्ये रस्ते, पाणीपुरवठा, वीज, वाहतूक, उद्याने, रहिवासी क्षेत्रे आणि व्यावसायिक ठिकाणे यांचे योग्य नियोजन केले जाते, जेणेकरून नागरिकांना सुखी, सुरक्षित आणि आरोग्यदायी जीवन जगता येईल. नैसर्गिक संसाधनांचा योग्य वापर करून पर्यावरणाचा समतोल राखणे. रस्ते, पाणी, वीज, आरोग्य आणि शिक्षणाच्या सोयी सहज उपलब्ध करून देणे. कोंडी टाळण्यासाठी रुंद रस्ते, पूल आणि सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचे नियोजन करणे. शहराचे रहिवासी, व्यावसायिक, औद्योगिक आणि हरित क्षेत्र अशा वेगवेगळ्या विभागांमध्ये वर्गीकरण करणे.

महाराष्ट्रामध्ये नगररचना व विकासासाठी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम1966- Maharashtra Regiona' लागू आहे. या कायद्यान्वये प्रादेशिक योजना, विकास आराखडे तयार केले जातात. अनधिकृत बांधकामांवर नियंत्रण ठेवणे आणि जमीन वापराचे नियमन करणे ही कामे नगर रचना आणि मूल्यनिर्धारण विभागामार्फत केली जातात. भारतात नगररचनेचा इतिहास हा सिंधू संस्कृतीच्या- हडप्पा संस्कृती काळापासून पाहिला मिळतो. मोहें-जो-दडो आणि हडप्पा येथील नगरे काटकोनात छेदणारे रस्ते, सांडपाण्याची झाकलेली गटारे आणि सुनियोजित विटांच्या घरांसाठी प्रसिद्ध होती. नगर रचना व्यवस्थापन, ज्याला शहर नियोजन, प्रादेशिक नियोजन, किंवा काही संदर्भांमध्ये ग्रामीण नियोजन असेही म्हणतात, ही एक तांत्रिक आणि राजकीय प्रक्रिया आहे. ही प्रक्रिया मुख्यतः जमीन वापराच्या विकास आणि डिझाइनवर केंद्रित असते. यात हवा, पाणी, आणि शहरी भागातील पायाभूत सुविधांचे नियोजन करणे, जसे की वाहतूक, दळणवळण आणि वितरण नेटवर्क, यांचा समावेश होतो. परंपरेने, शहरी नियोजनाने मानवी वसाहतींच्या भौतिक मांडणीसाठी टॉप-डाउन दृष्टिकोन वापरला आहे. मुख्य चिंता सार्वजनिक कल्याणाची होती, ज्यामध्ये कार्यक्षमता, स्वच्छता, संरक्षण आणि पर्यावरणाचा वापर, तसेच सामाजिक आणि आर्थिक क्रियाकलापांवर मास्टर प्लॅनचे परिणाम यांचा समावेश होता. कालांतराने, शहरी नियोजनाने सामाजिक आणि पर्यावरणीय तळ ओळींवर लक्ष केंद्रित केले आहे, ज्यामुळे लोकांचे आरोग्य आणि कल्याण सुधारण्यासाठी आणि शाश्वतता मानके राखण्यासाठी नियोजनाचा वापर केला जातो.

शहरी रचना म्हणजे दिलेल्या क्षेत्रातील लोक कसे राहतील, काम करतील आणि खेळतील याचे नियोजन करणे होय, आणि त्यामुळे शहरी, उपनगरी आणि ग्रामीण भागातील सुव्यवस्थित विकासाला मार्गदर्शन करणे. जरी हे मुख्यत: वस्ती आणि समुदायांच्या नियोजनाशी संबंधित असले तरी, शहरी नियोजक वस्तू, संसाधने, लोक आणि कचरा यांच्या कार्यक्षम वाहतुकीचे नियोजन करण्यासाठी देखील जबाबदार असतात; पाणी आणि वीज वासारख्या मूलभूत गरजांचे वितरण; सर्व प्रकारच्या लोकांसाठी समावेश आणि संधीची भावना निर्माण करणे; आर्थिक वाढ किंवा व्यवसाय विकास; आरोग्य सुधारणा आणि नैसर्गिक पर्यावरणीय महत्त्व असलेल्या क्षेत्रांचे संरक्षण करणे. शहरी नियोजक वास्ता संरचना आणि बांधलेल्या वातावरणाचे संरक्षण करण्यासाठी देखील जबाबदार असतात. बहुतेक शहरी नियोजन संघांमध्ये उच्च शिक्षित व्यक्ती असतात, ज्या शहर सरकारांसाठी काम करतात. अलीकडील वादविवाद शहरी नियोजन प्रक्रियेत अधिक समुदाय सदस्यांना कसे सामील करावे यावर लक्ष केंद्रित करतात. नगर रचना व्यवस्थापन हे एक आंतरविद्याशाखीय क्षेत्र आहे ज्यामध्ये सिव्हिल इंजिनीअरिंग, आर्किटेक्चर, मानवी भूगोल, राजकारण, सामाजिक शास्त्र, आणि रचना विज्ञान यांचा समावेश होतो.

दिवाळीच्या गोडव्यात भेसळीचे विष

प्रा. डॉ. सुधीर अग्रवाल
वर्धा

दिवाळी हा प्रकाशाचा, आनंदाचा आणि गोडधोड पदार्थांचा सण म्हणून संपूर्ण महाराष्ट्रात मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. या सणाच्या निमित्ताने बाजारपेठांमध्ये मिठाई, लाडू, चिवडा आणि इतर फराळाचे पदार्थ खरेदी करण्यासाठी नागरिकांची मोठी झुंबड उडते. दुकानांमधून मिळणाऱ्या रंगीबेरंगी आणि आकर्षक मिठाईच्या मागणीत या काळात प्रचंड वाढ होते. परंतु, ग्राहकांच्या याच वाढत्या मागणीचा आणि सणासुदीच्या घाईगडबडीचा गैरफायदा काही नफेखोर आणि बेजबाबदार व्यावसायिक घेताना दिसतात. नफ्याच्या लालसेपोटी ग्राहकांच्या आरोग्याशी खेळ खेळला जातो आणि निकृष्ट दर्जाची, भेसळयुक्त मिठाई तसेच इतर खाद्यपदार्थ राजरोसपणे बाजारात विकले जातात. सणासुदीच्या काळात नागरिकांच्या जिवाशी होणारा हा खेळ थांबवणे हे प्रशासनापुढील एक मोठे आव्हान असते आणि याच पार्श्वभूमीवर अन्न व औषध प्रशासनाने नुकतीच एक अत्यंत मोठी आणि महत्त्वाची कारवाई करून भेसळखोरांचे पितळ उघडे पाडले आहे.

अन्न व औषध प्रशासनाने पुणे विभागातील पुणे, पिंपरी-चिंचवड, सातारा, सांगली, कोल्हापूर आणि सोलापूर या जिल्ह्यांमध्ये भेसळविरोधी विशेष मोहीम राबवली. या मोहिमेअंतर्गत एकूण २५ आस्थापनांची अत्यंत कसून तपासणी करण्यात आली. या तपासणीमध्ये मिठाई, लाडू, बर्फी, मावा, तूप, काजू आणि विविध दुग्धजन्य पदार्थांच्या साठ्याची पाहणी करण्यात आली. या कारवाईचे स्वरूप इतके व्यापक होते की, प्रशासनाने तब्बल ९३५९ किलो वजनाचा संशयास्पद आणि निकृष्ट खाद्यपदार्थांचा साठा जप्त केला. जप्त करण्यात आलेल्या या प्रचंड साठ्याची बाजारातील अंदाजे किंमत ३४,१७,८७० रुपये इतकी आहे. नागरिकांच्या ताटात पडण्यापूर्वीच हा विषारी साठा जप्त करण्यात आल्याने एक प्रकारे मोठा अनर्थ टळला आहे. उघड्यावर ठेवलेले पदार्थ, अस्वच्छ परिसर आणि भेसळीचे वाढते प्रमाण यामुळे अन्नसुरक्षेचा प्रश्न किती गंभीर बनला आहे, हे या आकडेवारीवरून स्पष्ट होते.

विशेषतः दिवाळीच्या काळात फराळ आणि मिठाई बनवण्यासाठी तुपाचा सर्वाधिक वापर होतो. याच गोष्टीचा गैरफायदा घेत पुण्याच्या गणेश पेठेत बोगस आणि अस्वच्छ तुपाचा मोठा व्यापार सुरू असल्याचे या कारवाईत निष्पन्न झाले. गणेश पेठेतील मेसर्स न्यू गायत्री ट्रेडर्स येथून ३४३ किलो, तर मेसर्स कुंदन डेअरी डिस्ट्रिब्युटर्स येथून तब्बल १७९६ किलो गायीचे आणि देसी तूप जप्त करण्यात आले. धक्कादायक बाब म्हणजे न्यू गायत्री ट्रेडर्सकडे परवान्याचथे आवश्यक त्या व्यवसाय प्रकाराची कोणतीही नोंद नसतानाही अत्यंत अस्वच्छ वातावरणात तुपाचे पॅकिंग सुरू होते. प्रशासनाने ७ नोव्हेंबर २०२६ रोजी उघड केलेल्या या एकत्रित अहवालावरून हे स्पष्ट होते की, सणांच्या काळात ग्राहकांची फसवणूक करण्यासाठी भेसळमाफिया कशा प्रकारे संघटितपणे काम करत असतात. प्रशासनाने तातडीने पावले उचलत या आस्थापनांचा व्यवसाय परवाना निलंबित केला आहे.

केवळ जुन्या पोतांमध्येच नाही, तर शहराच्या विविध नामांकित आणि गजबजलेल्या भागांमध्येही हीच चिंताजनक परिस्थिती पाहायला मिळाली. वानवडी परिसरातील मेसर्स जय गणेश लाडूवाला येथून ४७३ किलो मोतीचूर लाडू व बुंदी, बाणेरमधील मेसर्स मनवार स्वीट्स येथून ३८ किलो मोतीचूर लाडू, तर एरंडवणे येथील मेसर्स उत्तम स्वीट्समधून २७ किलो मिठाई जप्त करण्यात आली. याव्यतिरिक्त मोहम्मदवाडीतील बिकानेर मिठाईवाले यांच्याकडून २६८ किलो बर्फी आणि कोथरूडमधील अन्नपूर्णा स्वीट्समधून १३२ किलो खाद्यपदार्थ ताब्यात घेण्यात आले. शिवाजीनगर गावठाणातील न्यू क्वालिटी डेअरी फार्ममध्येही दूध, दही, पनीर, क्रीम आणि तुपाचा मोठा साठा संशयास्पद स्थितीत आढळून आला. तसेच, तळेगाव ढमढेरे येथील मेसर्स बालाजी ड्रायफ्रूट्समधून ३३३.५ किलो खाद्यपदार्थ जप्त करून त्यातील २५.५ किलो साठा खराब असल्याने नष्ट करण्यात आला. देहूगावातील मेसर्स द्वारका स्वीट्स येथील ३० किलो मावा खाण्यास जप्त करण्यावरच समाधान मानले नाही, तर मानवी आरोग्याला अत्यंत घातक ठरू शकणारा आणि पूर्णपणे खराब झालेला सुमारे ६८३ किलो खाद्यपदार्थांचा साठा जागेवरच नष्ट केला. नष्ट करण्यात आलेल्या या पदार्थांची किंमत सुमारे १,५९,६६५ रुपये होती. निकृष्ट दर्जा, अस्वच्छता, अयोग्य साठवणूक आणि अन्नसुरक्षा नियमांचे सर्रास उल्लंघन केल्याप्रकरणी प्रशासनाने एकूण १२ आस्थापनांचे अन्न व्यवसाय परवाने तत्काळ निलंबित करून त्यांचे व्यवसाय कायदेशीररीत्या स्थगित केले आहेत. या अभ्यासपूर्ण आणि धडक कारवाईतून नागरिकांनीही एक मोठा धडा घेणे गरजेचे आहे. केवळ आकर्षक रंग आणि सजावट पाहून मिठाई खरेदी करण्यापेक्षा, अधिकृत, स्वच्छ आणि परवानाधारक दुकानांमधूनच खरेदीचा आग्रह धरायला हवा. आरोग्याशी कोणतीही तडजोड न करता, भेसळीचा संशय आल्यास त्वरित प्रशासनाकडे तक्रार करण्याचे धाडस ग्राहकांनी दाखवले, तरच अशा प्रवृत्तींना कायमचा आळा घालता येईल आणि सणाचा गोडवा खऱ्या अर्थाने टिकून राहील.

- ९५६१५९४३०६

सरकार सत्तेत असताना अचानक लोकशाही धोक्यात व अराजकता कशी काय निर्माण झाली? याचा अर्थ सरकार चुकीचे निर्णय घेत असावेत!

रमेश लांजेवार
नागपूर

देशातील गंभीर समस्या लपविण्यासाठी सरकार मोर्चे काढून व विरोधकांना टार्गेट करून आमजनतेपासून पळ काढण्याचा प्रयत्न करीत आहे ही बाब सिद्ध होते. कारण सत्ताधारी पक्ष कधीही मोर्चे काढत नाही. परंतु भारताच्या इतिहासात ही पहिलीच सरकार आहे की, मोर्चे काढून लोकतंत्र बचाओ अराजकता हटावो अशा पध्दतीने देशातील जनतेला भ्रमित करण्याचे काम सरकार करीत आहे.कारण अनपड, गवार, बुध्दीजीवी, विचारवंत हे सर्व हेच म्हणेल की,सत्ता असताना लोकशाही धोक्यात किंवा अराजकता कशी काय निर्माण झाली? यावरून हेच सिद्ध होते की सरकारनेच देशाला धोकादायक स्थितीत आणून ठेवले आहे. देशात लोकांच्या समस्या सरकारपर्यंत पोहचविण्याचे काम विरोधी पक्षाचे असते. त्यानुसार आंदोलन, मोर्चे, उपोषण काढून सरकारला आपल्या किंवा जनतेच्या समस्यांशी अवगत केले जाते. त्यात त्यांच्या मोर्चाची पध्दत वेगवेगळी राहू शकते. परंतु विरोधी पक्ष मोर्चे काढतात आणि त्याच्यापासून आपल्याला धोका निर्माण होऊ शकतो म्हणून सरकार पदयात्रेच्या माध्यमातून शक्ती प्रदर्शन करून देशात विरोधी पक्ष अराजकता पसरविते आहे असे म्हणने सरकारला शोभा देणारे नाही.

करीत आहे ही अराजकता सरकारला का दिसत नाही? यावर देशाच्या १४५ कोटी जनतेने मंथन करण्याची गरज आहे. देशात बेरोजगारी, महागाई, शेतकऱ्यांच्या आत्महत्या, अंदाधुंद वृक्षतोड इत्यादींपासून पळ काढण्यासाठी सरकार हे घुणास्पद कार्य करीत असावे.आज देशात विकासाचा नावाखाली मोठ्या प्रमाणात वृक्षतोड सुरू आहे.

यामुळे देशातील वातावरण आमुलाग्र बदल झाला असून मोठ्या प्रमाणात सर्वत्र प्रदुषण दिसत आहे व देशातील अनेक शहरे जनुकाय गॅस चेंबर झाले की काय अशी परिस्थिती वाढत्या प्रदूषणामुळे निर्माण झाली आहे आणि आता महाराष्ट्रातील ऐतिहासिक वारसा असलेले रायगड जिल्ह्यातील ६०० एकरमधील वृक्ष कटाईकरून टोरंट पॉवर प्रकल्प उभारण्याच्या तयारीत सरकार आहे. त्याचप्रमाणे भीमाशंकर वन्यजीव अभयारण्यापासून सुमारे १६ किलोमीटर अंतरावर, तर भीमाशंकर ज्योतिर्लिंग मंदिरापासून २० किलोमीटर अंतरावर आहे. यासर्व सरकारच्या घटनांचा नागरिक, सामाजिक संस्था, वन्यजीवप्रेमी कडाडून विरोध करीत आहेत.या सर्व घटना लपविण्यासाठी व पडदा टाकण्यासाठी सरकार मोर्चाच्या माध्यमातून देशभरात "लोकतंत्र बचाओ अराजकता हटावो" अशाप्रकारची लौटनकी करून सरकार देशातील लोकांची दिशाभूल करण्याचा प्रयत्न करीत आहे. सरकार सत्तेत असुन देशाचे प्रश्न सुटत नसतील व मोर्चे काढत असतील तर अशा सरकारचे काय काम? सरकारच्या मोर्चाच्या धोरणावरून स्पष्ट होते की,जनतेच्या प्रश्नांची उत्तरे व समस्या सोडविण्यास सरकार असमर्थ असावी.सरकार मोर्चे काढून आणि विरोधी पक्षांवर टीका टिप्पणी करून कामचुकारपणा करीत असल्याचे दिसून येते देशातील जनतेला सरकारकडून काम हवे असते मोर्चे नाही ही बाब सरकारने लक्षात ठेवली पाहिजे. जनतेच्या समस्या सरकारपर्यंत पोहचविण्यासाठी मोर्चे काढण्याचे काम विरोधकांचे असते आणि ते करीत आहे.

सत्ता असतांना देशात सरकार चुकीचे धोरण राबवून ते लपविण्यासाठी मोर्चे काढत असेल तर ही अत्यंत दुर्दैवी बाब म्हणावी लागेल. असेही होवू शकते की, देशातील महत्वपूर्ण विधानपरिषदेतील हार लपविण्यासाठी आणि लोकांचे मन विचलित करण्यासाठी लोकतंत्र बचाओ पदयात्रेचा डाव सरकारचा असू शकतो याला नाकारता येत नाही. सरकार जर काँग्रेस विरूद्ध भाजप अशीच लढत रहाली तर सर्वसामान्यांचे भवितव्य अंधारात जावू शकते.सरकारने एकमेकांवर टीका टिप्पणी अवश्य करावी. परंतु एकट्या ज्ञानेश कुमारसाठी देश खतरे है, संविधान खतरे मे है किंवा अराजकता वाढत असे म्हणने सरकारला शोभा देत नाही.मी मान्य करतो की विरोधक मोर्चे काढून गुन्हे करीत आहेत.परंतु "लोकतंत्र बचाओ अराजकता हटावो"च्या नावाखाली देशभरात पदयात्रा काढून ऐन दिवाळीच्या तोंडावर रस्ते जाम करने व याचा त्रास आमजनतेला देणे हे सरकारचे कितपत योग्य म्हणावे! त्यामुळे सरकारच्या या चुकीच्या धोरणामुळे देशात असमणजस्यतेचे वातावरण निर्माण झाल्याचे दिसून येते. आज देशात महागाई भस्मासुरासारखी वाढली, देशात दररोज कुठे ना कुठे शेतकरी आत्महत्या करतांना दिसतो, बेरोजगारी शिगेला पोहोचली आहे.

देशासह राज्यात पाणी टंचाईचे भिषण संकट ओढावणार आहे, कोरड्या दुष्काळामुळे शेतकरी संकटात आहे,बेरोजगारीमुळे जेनझीमध्ये आक्रोश निर्माण झाला आहे, विकासाच्या नावाखाली बेसुमार जंगलतोड सुरूच आहे यामुळे मानव,पशुपक्षी व संपूर्ण जीवजंतूचा जीव धोकादायक स्थितीत येऊन ठेपला आहे,महागडे शिक्षण,एक झाड १०० माणसांना ऑक्सिजन देतो अशा हजारो झाडांची कत्तल या संपूर्ण गंभीर समस्यांनवर पडदा टाकण्यासाठी सरकार विरोधकांवर पदयात्रेच्या माध्यमातून मोर्चे काढून पलटवार करताना दिसत आहे ही बाब लोकशाहीला शोभा देणारी नसून सत्ताधाऱ्यांसाठी शरमेची बाब आहे.ऐन दिवाळीच्या तोंडावर भाजपाने पदयात्रा काढल्याने संपूर्ण वाहतूक चक्का जाम सारखी परिस्थिती निर्माण केली होती.यामुळे नागरिकांमध्ये मोठ्याप्रमाणात रोष सुध्दा दिसून आला.

लोकतंत्र बचाओ अराजकता हटावो या सरकारच्या घोषवाक्यावरून असे चित्र दिसत आहे की,देश खरोखरच धोकादायक स्थितीत सरकारने आणुन ठेवला की काय ?सरकार आपल्या कार्यप्रणालीवर कुठेतरी चूक करीत असावी त्यामुळे देशात सरकारच्या माध्यमातूनच अराजकता निर्माण झाली असावी असे मला वाटते.सरकार एकीकडे सांगत आहे की, देशातील नक्षलवाद,आंतकवाद संपूष्टात आणला आणि देशात मोठ्या प्रमाणात विकास झाल्याचे सांगितले जाते एवढे सर्व चांगले कामे सरकार करतीत आहे तर देश वाचविण्यासाठी मोर्चे किंवा पदयात्रा हा तमाशा व शोबाजी कशासाठी सरकार करीत आहे.

- ९९२१६९०७७९

भारत - न्यूझीलंड : दुसऱ्या वनडेत पावसाची मेहेरबानी भारताची सरशी!

डॉ.दत्ता विघावे
क्रिकेट समिक्षक

दुसऱ्या एकदिवसीय सामन्यात भारताने न्यूझीलंडला डकवर्थ-लुईस पद्धतीनुसार ४ धावांनी पराभूत केले. वेलिंग्टन येथे झालेल्या या सामन्यादरम्यान, विराट कोहलीने ऑस्ट्रेलियाच्या रिकी पाँटिंगचा विक्रम मोडला आणि न्यूझीलंडविरुद्ध एकदिवसीय सामन्यांमध्ये सर्वाधिक धावा करणारा फलंदाज बनला. रोहित शर्मानें पाकिस्तानचा माजी क्रिकेटपटू शाहिद आफ्रिदीचा विक्रम मोडला. दरम्यान, भारतीय वेगवान गोलंदाज गुरनूर ब्रार आणि न्यूझीलंडचा फलंदाज डॅरिल मिचेल यांच्यात वाद झाला.

भारत-न्यूझीलंड दुसऱ्या एकदिवसीय सामन्यात घडलेले प्रमुख विक्रम आणि क्षण...

कोहली न्यूझीलंडविरुद्ध एकदिवसीय सामन्यांमध्ये सर्वाधिक धावा करणारा फलंदाज आहे.

कोहलीने न्यूझीलंडविरुद्ध एकदिवसीय सामन्यांमध्ये १,९७८ धावा केल्या आहेत. पाँटिंगच्या १,९७१ धावा आहेत. सचिन तेंडुलकर १,७५० धावांसह तिसऱ्या क्रमांकावर आहे.

रोहितने न्यूझीलंडविरुद्ध सर्वाधिक षटकार मारले

रोहित न्यूझीलंडविरुद्ध एकदिवसीय सामन्यांमध्ये सर्वाधिक षटकार मारणारा फलंदाज ठरला आहे. त्याने शनिवारी दोन षटकार मारले.



रोहितने न्यूझीलंडविरुद्ध ५१ षटकार मारले आहेत. यापूर्वी शाहिद आफ्रिदीने ५० षटकार मारले होते.

मायदेशात भारताविरुद्ध न्यूझीलंडची सर्वात कमी धावसंख्या

न्यूझीलंडचा संघ १३४ धावांवर सर्वबाद झाला. मायदेशात भारताविरुद्ध संघाची ही सर्वात कमी एकदिवसीय धावसंख्या आहे. यापूर्वी १९९४ मध्ये ऑकलंड येथे १४२ धावा झाल्या होत्या.

गुरनूरने शमी आणि अर्शदीपला मागे टाकले

गुरनूर ब्रारने वेलिंग्टनमध्ये ३० धावांत ४ बळी घेतले. न्यूझीलंडमधे भारतीय वेगवान गोलंदाजाने केलेली ही दुसरी सर्वोत्तम गोलंदाजी आहे. या बाबतीत जवागल श्रीनाथ पहिल्या क्रमांकावर आहे. त्याने २००३ मध्ये ऑकलंड येथे २३ धावांत ४ बळी घेतले.

गुरनूर ब्रारच्या बाउन्सरने जेमिसनच्या डोक्याला दुखापत

३८ व्या षटकात गुरनूर ब्रारच्या बाउन्सरने जेमिसनला दुखापत झाली. ताशी सुमारे १४० किमी वेगाच्या चेंडूवर जेमिसनने पुल शॉट मारण्याचा प्रयत्न केला, पण तो फसला. चेंडू त्याच्या हेल्मेटच्या ग्रीलला लागला. ताकाळ, भारतीय खेळाडू त्याची विचारपूस करण्यासाठी त्याच्याकडे धावले. त्यानंतर फिजिओ मैदानावर आले आणि त्यांनी डोक्याला झालेल्या दुखापतीची (कन्कशन) तपासणी केली. जेमिसनचा पुल शॉट फसला आणि चेंडू त्याच्या हेल्मेटच्या ग्रीलला लागला.

गिल पहिल्याच चेंडूवर बाद

जेकब डफीच्या पहिल्याच चेंडूवर गिल बाद झाला. डफीच्या ऑफ-स्टंपच्या बाहेर टाकलेल्या चेंडूला गिलच्या बॅटची कड लागली. चेंडू दुसऱ्या स्लिपमध्ये गेला, जिथे हेन्री निकोल्सने पुढे झुकून झेल घेतला. रिप्ले पाहिल्यानंतर तिसऱ्या पंचांनी गिलला बाद घोषित केले. क्रिकेटच्या भाषेत फलंदाजाने खेळलेल्या पहिल्याच चेंडूवर बाद होण्याला गोल्डन डक म्हणतात. तो नकोसा असलेला प्रकार भारतीय कर्णधाराच्या वाट्याला आला.

रोहितला जीवदान, पुढच्याच चेंडूवर कोहली बाद

भारतीय डावाच्या चौथ्या षटकातील तिसऱ्या चेंडूवर रोहितला जीवदान मिळाले. जेकब डफीच्या चेंडूने रोहितच्या बॅटची वरची कड घेतली. मात्र, डीप बॅकवर्ड स्क्वेअर लेगला उभ्या असलेल्या नॅथन स्मिथने झेल सोडला. या चेंडूवर १ धाव मिळाली. मात्र, डफीने पुढच्याच चेंडूवर विराट कोहलीला बाद केले. कव्हर ड्राईव्ह मारण्याच्या प्रयत्नात कोहली विल यंगकरवी झेलबाद झाला.

पावसाने बाधीत झालेल्या या सामन्यात गोलंदाजांना अनुकूल असलेली खेळपट्टी व वातावरण होते. सफेद चेंडूच्या दोन्ही प्रारूपात फलंदाज नेहमी गोलंदाजांवर वरचढ ठरतात. मात्र या सामन्यात दोन्ही संघांच्या गोलंदाजांनी फलंदाजांवर हुकूमत गाजवली. परिणामतः प्रेक्षकांना एक थरारक सामन्याचा आस्वाद घेता आला. तरीही पावसामुळे सामना पूर्ण होऊ न शकल्याने प्रेक्षकांना फारसे समाधान मिळाले नाही. भारताने मालिकेत २-० अशी आघाडी घेऊन मालिका विजयाच्या दिशेने पाऊल पुढे टाकले आहे. उर्वरीत तीन पैकी एक सामना जिंकला तरी मालिका भारताच्या झोळीत पडेल. मात्र या सामन्यातील भारतीय फलंदाजांची कामगिरी चिंतेत भर घालणारी झाली हे ही तितकेच सत्य आहे.

- ९०९६३७२०८२

सिंहवाणी वृत्त हे मराठी, हिंदी भाषेतील दैनिक वृत्तपत्र प्रकाशक, मुख्य संपादक अजय दिलीपराव बिवडे यांनी हाऊस नं. ५८४२, प्लॉट नं ५२, जुने ज्ञानेश्वर नगर, मानेवाडा रोड, नागपूर (महाराष्ट्र)-४४००२७ येथून प्रकाशित केले असून अव्दैत प्रकाश चव्हाण, अव्दैत प्रिंटर्स, ग्रीन सिटी-३, वर्धा रोड, गौसी मानापूर, नागपूर-४४११०८ (महाराष्ट्र) येथून मुद्रित केले आहे. संपर्क क्र. ८६९८७८८६६६ - मेल आयडी : sinhvanivrutta@gmail.com / ई-पेपर : epaper.sinhvani.com (Reg. No : MHBIL/25/A4140)

सिनियर भोंसला पॅलेस येथे श्रीमंत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याचे अनावरण

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

सिनियर भोंसला पॅलेस येथे नुकताच हिंदवी स्वराज्याचे संस्थापक श्रीमंत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याचा अनावरण सोहळा अत्यंत दिमाखात आणि मंगलमय वातावरणात संपन्न झाला. या ऐतिहासिक आणि गौरवशाली क्षणाचे साक्षीदार होण्यासाठी अनेक मान्यवर, संत-महंत आणि राजकीय क्षेत्रातील दिग्गजांची उपस्थिती लाभली.



या पुतळ्याचे अनावरण राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प. पू. सरसंघचालक माननीय मोहनजी भागवत, प. पू आचार्य स्वामी श्री जितेंद्रनाथ महाराज (पिठाधीश्वर, देवनाथ मठ, सुर्जी अंजनगाव), महामंडलेश्वर स्वामी हरीहरानंदजी सरस्वती महाराज (दैवी संपत अधिपती, अमरकंटक, महामंडलेश्वर स्वामी अजय रामदास महाराज (उपपात्र, श्री मणी रामदास छावणी, श्री दिगंबर आखाडा, अयोध्या धाम), तसेच, मध्य प्रदेश शासनाच्या कॅबिनेट मंत्री तथा सिंगरोली व अलीराजपूर जिल्ह्यांच्या पालकमंत्री संपत्तीया उईके यांची विशेष उपस्थिती होती. त्यांच्या आणि सर्व मान्यवर संतांच्या शुभहस्ते हा अनावरण सोहळा पार पडला. या भव्य आणि ऐतिहासिक कार्यक्रमाचे आयोजन भोसले घराण्याचे वंशज राजे मुधोजी भोंसले आणि राजे जयसिंह भोंसले यांच्या पुढाकाराने व मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते. या सोहळ्याने छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारांचा आणि कार्याचा जागर करत उपस्थितांच्या मनात स्वराज्याविषयीची आणि शिवरायांविषयीची आदराची भावना अधिक दृढ केली.

या सोहळ्याचे प्रास्ताविक (पुतळ्याची माहिती) राजे जयसिंह भोंसले यांनी दिली. आभार प्रदर्शन राजे मुधोजी भोंसले यांनी तर सूत्रसंचालन सारंग ढोक यांनी केले.

थोडक्यात

संभाव्य पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाची गावोगावी पाहणी

विहिरी, बोअरवेल आणि नळ योजनांची तपासणी; टंचाई निवारणासाठी कृती आराखडा तयार



दै. सिंहवाणी वृत्त, भिवापूर

दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर आगामी काळात उद्भवणाऱ्या संभाव्य पाणीटंचाईवर मात करण्यासाठी भिवापूर प्रशासनाने कंबर कसली आहे. ६ नोव्हेंबर रोजी महसूल व संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांनी विविध गावांना भेटी देत पाणीपुरवठ्याच्या सद्यस्थितीचा आढावा घेतला. तसेच टंचाई निवारणासाठी आवश्यक उपाययोजनांबाबत ग्रामस्थांशी चर्चा केली. उपविभागीय अधिकारी विद्यासागर चव्हाण, तहसीलदार संजय राठोड, पाणीपुरवठा विभागाचे उपअभियंता अमित तुरकर आणि कृषी अधिकारी सुरेंद्र खुजे यांनी मांगली जगताप, धामणगाव विद्यामंदिर, टाका, भगवानपूर, महालगाव, बेसूर, कवडसी बरड आदी गावांना भेटी दिल्या. यावेळी गावातील विहिरी, बोअरवेल, हातपंप, नळ पाणीपुरवठा योजना आणि पाणी साठवणूक यंत्रणांची पाहणी करण्यात आली. सद्यस्थितीत उपलब्ध असलेले जलस्रोत, भविष्यात उपलब्ध होऊ शकणारे पर्यायी स्रोत आणि पाण्याचा काटकसरीने वापर याबाबत सरपंच, ग्रामपंचायत सदस्य व ग्रामस्थांशी संवाद साधण्यात आला. आवश्यकतेनुसार विहिरी आणि बोअरवेल अधिग्रहित करण्याबाबतही प्रशासनाने माहिती दिली.

संभाव्य पाणीटंचाई लक्षात घेता प्रशासनाने कृती आराखडा तयार केला असून नागरिकांना शुद्ध पाणीपुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना प्राधान्याने राबविण्यात येतील, अशी ग्वाही अधिकाऱ्यांनी दिली. याशिवाय गटविकास अधिकारी, सहाय्यक गटविकास अधिकारी, नायब तहसीलदार, मंडळ अधिकारी व विस्तार अधिकाऱ्यांनीही विविध गावांना भेटी देऊन ग्रामस्थांशी संवाद साधला.

नांदगाव येथे मंडई उत्सवाला आजपासून सुरुवात

दै. सिंहवाणी वृत्त, किशोर साहू : मौदा

अरोली - कोदामेंढी जि प सर्कल अंतर्गत येत असलेल्या नांदगाव येथे दरवर्षीप्रमाणे वंदाही मंडई उत्सव समितीतर्फे दोन दिवसीय मंडई निमित्त सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. उद्या मंगळवार (ता.१० नोव्हेंबर)ला सायं रेकॉर्डिंग डान्स, बुधवार (ता.११ नोव्हेंबर) ला सकाळपासून सायंकाळपर्यंत दिवसभर तमाशा तर सायं पुन्हा रेकॉर्डिंग डान्स चे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या उद्घाटनाला भाजपा तालुका मौदा मंडळ अध्यक्ष भगवान बावनकुळे, तालुका शिवसेनाप्रमुख प्रशांत भुरे, माजी जिल्हा परिषद सदस्य योगेश देशमुख सह गावातील,परिसरातील, तालुक्यातील,राजकीय व सामाजिक क्षेत्रातील मान्यवर उपस्थित राहणार आहे, अशी माहिती प्रमणध्वनी वरून ग्रामपंचायत नांदगाव सरपंच दीपक पडोळे यांनी सोमवार (ता. ९ नोव्हेंबर)ला सायं दरम्यान दिली.

खापा मांगली येथे तुमसर पोलिसाकडून गांजाची अवैध वाहतूक करणाऱ्या दोघांना अटक तुमसर पोलीसांनी या धडक कारवाईत २ कि. ७७० ग्रॅम गांजा जप्त केला



दै. सिंहवाणी वृत्त, तुमसर

पोलीस स्टेशन तुमसर हद्दीत अवैधरित्या गांजाची वाहतूक होत असल्याबाबत गोपनीय माहिती प्राप्त झाल्याने तुमसर पोलीस पथकाने मिळालेल्या माहितीच्या आधारे दिनांक ९ नोव्हेंबर रोजी वेळ पहाटे ५ वा. दरम्यान खापा मांगली येथे तुमसर पोलीसांनी छापा कारवाई केली. सदर कारवाईदरम्यान आरोपी नामे अक्षय नागसेन गजभिये वय २७ वर्ष रा. परसोडी/जवाहरनगर ता. जि. भंडारा, आर्यन चोपराम मेश्राम वय २१ वर्ष रा. परसोडी/जवाहरनगर ता. जि. भंडारा याच्याकडून २.७७० किलोग्रॅम गांजा प्रति किलोर ५० हजार रू प्रमाणे एकुण १,३४,२५०/-रू., सुझुकी कंपनीची बर्गमॅन मोपेड क्र. एम.एच.- ३६ ए. पी-२५२३ कि. ६०,०००, एक विवो कंपनीचा निळ्या रंगाचा अँन्ड्राईड मोबाईल कि. ५००० /- रू., एक विवो कंपनीचा सिल्वर रंगाचा अँन्ड्राईड मोबाईल कि. १० हजार/- रु. चा. असा संपुर्ण एकुण मुद्देमाल किंमती २,०,२५० चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. याप्रकरणी आरोपीविरुद्ध पोलीस स्टेशन तुमसर येथे अप.क्र. ११०८/२०२६ कलम ८ (क), २० (ब)/ (ब), २९ एन.डी.पी.एस. अँक्ट १९८५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपीस कायदेशीर प्रक्रियेनुसार ताब्यात घेण्यात आले आहे. सदर गुन्ह्याचा पुढील तपास सुरू असून गांजाचा स्रोत, पुरवठादार, विक्री साखळी तसेच इतर संबंधित व्यक्तींचा शोध घेण्यात येत आहे. सदर कारवाई पोलीस अधीक्षक नुरूल हसन अपर पोलीस अधीक्षक निलेश मोरे सा., सहा. पोलीस अधिक्षक तेजस सारडा साहेब,अतिरीक्त कार्यभार उपविभाग तुमसर, पोलीस स्टेशन तुमसर चे ठाणेदार सुभाष बारसे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. सदर कारवाईत पोलीस स्टेशन तुमसर येथील पो. ना. बाळासाहेब आघाव, सपोनी किशोर घोडेस्वार, पो. शी. अजय बावणे, पो. शी. निखील बिसने, पो. शी. राजु गिरेपुंजे, पो. शी. महेश नैताम यांनी सक्रीय सहभाग घेतलेला आहे.

अमली पदार्थांची अवैध विक्री, वाहतूक व सेवन याविरुद्ध पोलीस विभागाकडून कठोर कारवाई करण्यात येत असून नागरिकांनी अशा अवैध कृत्यांची माहिती पोलिसांना देऊन सहकार्य करावे, असे आवाहन ठाणेदार पोलीस ठाणे तुमसर कडून करण्यात येत आहे.

कहाली-पानगाव रस्त्याच्या दुरुस्तीचा मार्ग मोकळा!

अनेक वर्षांपासून प्रलंबित रस्त्याच्या कामाबाबत आमदार संजय पुराम यांचे सकारात्मक आश्वासन; ग्रामविकास निधीतून लवकरच काम सुरू होणार, नागरिकांच्या आशा पल्लवित

दै. सिंहवाणी वृत्त, राजु फुंडे-सालेकसा

सालेकसा तालुक्यांतर्गत येणाऱ्या कहाली-पानगाव मार्गाच्या दुरवस्थेबाबत अखेर सकारात्मक हालचाली सुरू झाल्याचे चित्र दिसत आहे. गेल्या अनेक वर्षांपासून रस्त्याच्या दुरुस्तीची प्रतीक्षा करणाऱ्या ग्रामस्थांसह वाहनधारकांसाठी ही दिलासादायक बातमी आहे. या रस्त्याचे दुरुस्तीचे काम ग्रामविकास निधीतून करण्यात येईल, असे आश्वासन आमगाव-देवरी विधानसभा क्षेत्राचे आमदार संजय पुराम यांनी दिले आहे. तसेच ३०५४ अंतर्गत प्रस्तावित कामही लवकरात लवकर पूर्ण करण्याची ग्वाही त्यांनी दिली आहे. कहाली-पानगाव रस्त्यावर ठिकठिकाणी मोठमोठे खड्डे पडले असून, पावसाळ्यात या खड्ड्यांमध्ये पाणी साचल्याने वाहनचालक आणि पादचाऱ्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागतो. रस्त्याच्या दयनीय अवस्थेमुळे अपघातांचा धोकाही वाढला आहे. सन २०१९ पासून या रस्त्याच्या दुरुस्तीबाबत वारंवार आश्वासने मिळत आहेत; मात्र प्रत्यक्ष कामाला सुरुवात न झाल्याने नागरिकांमध्ये नाराजी वाढत होती.



या गंभीर समस्येकडे शासन, प्रशासन आणि लोकप्रतिनिधींचे लक्ष वेधण्यासाठी सामाजिक कार्यकर्त्यांकडून सातत्याने पाठपुरावा केला जात आहे. याच अनुषंगाने निवेदन सादर करताना सामाजिक कार्यकर्ते मानदास बसेना, योगराज मरसकोल्हे, रमेश लिल्हारे, दुर्गाप्रसाद लिल्हारे आणि योगेश दमाहे उपस्थित होते. यावेळी आमदार संजय पुराम यांनी सांगितले की, कहाली-पानगाव रस्त्याच्या दुरुस्तीच्या कामाबाबत यापूर्वीच शासन व प्रशासन स्तरावर चर्चा करण्यात आली आहे. सदर रस्त्याचे काम ग्रामविकास निधीतून करण्यासाठी प्रयत्न सुरू असून, ३०५४ अंतर्गत प्रलंबित कामदेखील लवकरात लवकर पूर्ण करण्याचे आश्वासन त्यांनी दिले.

अनेक वर्षांच्या प्रतीक्षेनंतर आशेचा किरण!

दीर्घकाळापासून प्रलंबित असलेल्या या रस्त्याच्या दुरुस्तीबाबत सकारात्मक संकेत मिळाल्याने परिसरातील नागरिकांच्या आशा पल्लवित झाल्या आहेत. आता केवळ आश्वासनांपुरतेच हे प्रकरण मर्यादित न राहता प्रत्यक्ष कामाला लवकरात लवकर सुरुवात व्हावी, अशी अपेक्षा ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे. आता शासन-प्रशासनाच्या पुढील कार्यवाहीकडे आणि रस्त्याच्या दुरुस्तीचे काम प्रत्यक्षात कधी सुरू होते, याकडे संपूर्ण परिसरातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.

आदिवासी संस्कृतीचे जतन आणि परंपरेचा जागर; मुरकूडो येथे पारंपरिक 'गाय खेळणी' कार्यक्रम उत्साहात!

दै. सिंहवाणी वृत्त, राजु फुंडे- सालेकसा : आदिवासी समाजाची समृद्ध संस्कृती, परंपरा आणि रूढी-रीती यांचे जतन करण्याच्या उद्देशाने सालेकसा तालुक्यातील मुरकूडो येथे दीपावलीच्या दुसऱ्या दिवशी पारंपरिक 'गाय खेळणी' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या पारंपरिक कार्यक्रमात सहभागी होऊन आदिवासी समाजाच्या सांस्कृतिक वारशाचे दर्शन घेण्याची संधी उपस्थितांना मिळाली.





आदिवासी समाजात दीपावलीच्या दुसऱ्या दिवशी गाय खेळणी ही पारंपरिक प्रथा मोठ्या उत्साहाने साजरी केली जाते. या परंपरेतून समाजाचे निसर्गाशी असलेले नाते, सांस्कृतिक एकता आणि पूर्वजांपासून चालत आलेल्या रूढी-परंपरांचे महत्त्व अधोरेखित होते. यावेळी आदिवासी समाजाच्या परंपरा व संस्कृतीचा गौरव करताना मुकेश इनवाते, अध्यक्ष आदिवासी आघाडी, भाजप मंडळ सालेकसा यांनी या पारंपरिक कार्यक्रमात सहभाग नोंदविला. आदिवासी संस्कृती ही केवळ परंपरा नसून ती समाजाची खरी ओळख आणि अस्मिता आहे. आपल्या पूर्वजांनी जपलेला हा अनमोल सांस्कृतिक वारसा पुढील पिढीपर्यंत पोहोचविणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे, अशी भावना यावेळी व्यक्त करण्यात आली. आधुनिकतेच्या प्रवाहात आपल्या पारंपरिक सण-उत्सवांचे आणि सांस्कृतिक प्रथांचे महत्त्व कमी होऊ न देता त्या अधिक उत्साहाने साजऱ्या केल्या पाहिजेत. अशा उपक्रमांमुळे नव्या पिढीला आपल्या संस्कृतीची ओळख होऊन परंपरेचे जतन करण्याची प्रेरणा मिळते.

फटाक्याच्या एका ठिणगीने घराला भीषण आग : चंद्रपुरात मोठा अनर्थ टळला

दै. सिंहवाणी वृत्त, चंद्रपूर -धनंजय पांढरे

दिवाळीचा उत्साह आणि फटाक्यांचा जल्लोष सुरू असतानाच एका निष्काळजी ठिणगीने बालाजी वॉडार्तील एका कुटुंबाच्या आनंदावर विरजण पडले. फटाक्यातून उडालेली ठिणगी थेट घराच्या दुसऱ्या माळ्यावर पडली आणि काही क्षणांतच घराला भीषण आग लागली. आगीच्या ज्वालांनी घरातील साहित्याला वेढा घातला. या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली. सुदैवाने घरातील सर्व सदस्य सुरक्षित असून, अग्निशमन दलाच्या वेळीच केलेल्या प्रयत्नांमुळे मोठा अनर्थ टळला. ८ नोव्हेंबर रोजी रात्री ९ वाजताच्या सुमारास बालाजी वॉर्ड परिसरात किशोर भामकर यांच्या घराबाहेर लहान मुले फटाके फोडत होती.



याचदरम्यान एका फटाक्याची ठिणगी उडून घराच्या दुसऱ्या माळ्यावर पडली. तेथे असलेल्या साहित्याने अचानक पेट घेतला. सुरुवातीला लागलेली आग काही क्षणांतच वाढत गेली आणि आगीच्या ज्वाळा पसरू लागल्या.

घराला आग लागल्याचे दिसताच परिसरातील नागरिक मदतीसाठी धावले. काही क्षणांपूर्वी दिवाळीच्या आनंदात रमलेला परिसर अचानक भीतीच्या सावटाखाली आला. नागरिकांनी तत्काळ अग्निशमन दलाला घटनेची माहिती दिली. अग्निशमन दलाचे जवान घटनास्थळी दाखल होताच त्यांनी आग विझविण्यासाठी प्रयत्न सुरू केले. अथक प्रयत्नांनंतर आगीवर नियंत्रण मिळविण्यात यश आले.

या दुर्घटनेत घरातील साहित्याचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. मात्र, घरातील सदस्यांना कोणतीही दुखापत झाली नाही. आग शेजारील घरांपर्यंत पोहोचली असती, तर मोठी दुर्घटना घडण्याची शक्यता होती. अग्निशमन दलाच्या जवानांनी दाखविलेल्या तत्परतेमुळे एका कुटुंबावर आलेले संकट टळले. दिवाळीचा आनंद काही क्षणांसाठी भीतीत बदलला असला, तरी सर्वजण सुरक्षित असल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त केले.

एटीएममधून कमी आलेले पैसे परत देण्याच्या बहाण्याने ५.४३ लाखांची फसवणूक : सायबर भामटा कोलकात्यातून जेरबंद

दै. सिंहवाणी वृत्त, चंद्रपूर-धनंजय पांढरे

एटीएममधून पैसे कमी आल्याची तक्रार केल्यानंतर उर्वरित रक्कम परत मिळवून देण्याचे आमिष दाखवत एका शालेय मुख्याध्यापिकेची तब्बल ५ लाख ४३ हजार रुपयांनी ऑनलाईन फसवणूक करणाऱ्या आंतरराज्यीय सायबर भामट्याला चंद्रपूर सायबर पोलिसांनी पश्चिम बंगालमधील कोलकाता येथून अटक केली आहे. अंगद सुरज प्रजापती (वय २१), रा. कोलकाता, पश्चिम बंगाल असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव असून, चार दिवस अहोरात्र शोधमोहीम राबवून पोलिसांनी त्याला जेरबंद केले.



पोलीस कोठडी संपल्यानंतर ७ नोव्हेंबर रोजी न्यायालयात हजर केले असता त्याची न्यायालयीन कोठडीत रवानगी करण्यात आली असून, त्याची चंद्रपूर जिल्हा कारागृहात पाठवणी करण्यात आली आहे.या प्रकरणातील ५८ वर्षीय शालेय मुख्याध्यापिकेने ३० ऑगस्ट २०२६ रोजी ऑक्सिस बँकेच्या एटीएममधून पाच हजार रुपये काढण्याचा प्रयत्न केला होता. मात्र, त्यांच्या खात्यातून रक्कम वजा होऊनही एटीएममधून ९०० रुपये कमी मिळाले. याबाबत त्यांनी बँकेत रीतसर तक्रार नोंदवली होती. हीच बाब हेरून सायबर भामट्याने त्यांना अनोळखी मोबाईल क्रमांकावरून फोन केला. बँकेचा कर्मचारी असल्याचे भासवत एटीएममधून ९०० रुपये कमी आल्याची खात्री करून त्याने त्यांचा विश्वास संपादन केला. त्यानंतर आरोपीने व्हॉट्सअपवर बनावट एपीके फाईल पाठवून ती डाऊनलोड करण्यास सांगितले. याअँपमध्ये बँकेचा एटीएम पिन आणि सीव्हीव्ही क्रमांक भरण्यास सांगून आरोपीने बँक खात्याची गोपनीय माहिती मिळवली. त्यानंतर विविध ऑनलाईन व्यवहारांच्या माध्यमातून खात्यातील ५ लाख ४३ हजार रुपये परस्पर वळवून घेतले. आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर या प्रकरणी चंद्रपूर सायबर पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ००६/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता आणि माहिती तंत्रज्ञान कायद्याच्या विविध कलमांखाली गुन्हा दाखल करण्यात आला.

गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस अधीक्षक आयुष नोपाणी यांनी विशेष तपास पथक तयार करून पश्चिम बंगालमधील कोलकाता येथे रवाना केले. सायबर पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक निलेश गिरी, पोलीस अंमलदार राहुल पोंदे, अनिमेश भोंगळे आणि पंकज बावणे यांच्या पथकाने स्थानिक पोलिसांच्या मदतीने सलग चार दिवस अहोरात्र शोधमोहीम राबवली. तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे आरोपीचा माग काढत उल्टाडांगा पोलीस ठाण्याच्या हद्दीतून अंगद सुरज प्रजापती याला ताब्यात घेऊन अटक करण्यात आली.

आरोपीला चंद्रपूर येथे आणल्यानंतर न्यायालयाकडून तीन दिवसांची पोलीस कोठडी मिळवण्यात आली. या काळात त्याची सखोल चौकशी करण्यात आली असून, फसवणुकीच्या या प्रकारात सहभागी असलेले इतर साथीदार आणि संपूर्ण सायबर नेटवर्कचा शोध घेण्याचे काम पोलिसांकडून सुरू आहे. ७ नोव्हेंबर रोजी पोलीस कोठडीची मुदत संपल्यानंतर आरोपीला न्यायालयात हजर करण्यात आले. न्यायालयाने त्याची न्यायालयीन कोठडीत रवानगी केली.

सदर कारवाई पोलीस अधीक्षक आयुष नोपाणी, अपर पोलीस अधीक्षक ईश्वर कातकडे आणि उपविभागीय पोलीस अधिकारी प्रमोद चौगुले यांच्या मार्गदर्शनाखाली सायबर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सुनील गाडे यांचा नेतृत्वात सहाय्यक पोलीस निरीक्षक निलेश गिरी,सहाय्यक पोलीस निरीक्षक राजेंद्र सोनवणे, अनिसा सय्यद, सहाय्यक पोलीस निरीक्षक राजेंद्र सोनवणे, अनिसा सय्यद, सहायक पोलीस उपनिरीक्षक मुजावर अली, पोलीस हवालदार कार्तिक खनके, उमेश रोडे, पोलीस अंमलदार राहुल पोंदे, अनिमेश भोंगळे, पंकज बावणे, गुणवंत मुंडके, साहिल आवारी, छाया शंभरकर, पूजा जांभुळे, अंजली घिवे आणि श्रुतीका घाईत यांनी केले. दरम्यान, बँकेचे अधिकारी किंवा कर्मचारी फोनवरून कधीही एटीएम पिन, ओटीपी अथवा सीव्हीव्ही क्रमांकासारखी गोपनीय माहिती मागत नाहीत. अनोळखी व्यक्तीकडून व्हॉट्सअप किंवा संदेशाद्वारे पाठवण्यात आलेल्या एपीके फाईल डाऊनलोड करू नयेत. कोणत्याही परिस्थितीत बँक खात्याची गोपनीय माहिती इतरांना देऊ नये. ऑनलाईन फसवणूक झाल्यास तातडीने १९३० या सायबर हेल्पलाईन क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन चंद्रपूर सायबर पोलिसांनी केले आहे.

थोडक्यात

आजनगांव येथे दोन दिवसीय मंडई उत्सवाला आजपासून सुरुवात

दै. सिंहवाणी वृत्त, किशोर साहू : मौदा

तारसा - धामणगांव जि प क्षेत्रातील गट ग्रामपंचायत आजनगांव (इसापूर)अंतर्गत येत असलेल्या आजनगांव येथे मागील १३ वर्षापूर्वीप्रमाणे यंदा १४ व्या वर्षीही पशु गोवर्धनाच्या दिवसापासून पशुगोवर्धन गिरीधारी मंडळ आजनगांवतर्फे उद्या मंगळवार (ता.१० नोव्हेंबर) पासून दोन दिवसीय मंडई उत्सवाला सुरुवात होत आहे. मंगळवार (ता.१० नोव्हेंबर)ला सायं.८ वाजता मौदा तालुक्यातील आदासा येथील शाहीर नीलकंठ लेंडे यांच्या संपूर्ण पार्टी सहित नवयुवक शुभान दंडार पार्टी यांच्या दंडारीच्या कार्यक्रम आयोजित केला आहे. या कार्यक्रमाचे अध्यक्ष माजी जि प अध्यक्ष सुरेश भोयर तर कार्यक्रमाचे उद्घाटक माजी जि प सदस्य देवेंद्र गोडबोले राहणार आहेत. बुधवार (ता.११ नोव्हेंबर)ला सकाळी १० वाजता कामठी तालुक्यातील आडका (माजरी) येथील शाहीर मारोती मारबते यांच्या विरुद्ध चिमूर तालुक्यातील नवेगाव येथील शाहीरा जया बोरकर यांच्या राष्ट्रीय दुय्यम खडा तमाशा तर सायं ८ वाजता राष्ट्रीय कथासार गोंधळ पार्टी (परसोडी राजा) शाहीर कवडू भाऊ उद्धव यांच्या संपूर्ण पार्टी सहित गोंधळ चे आयोजन केले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष राज्यमंत्री आशिष जयस्वाल तर उद्घाटक खासदार श्यामकुमार बर्वे उपस्थित राहणार आहेत.

कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून गावातील, परिसरातील, तालुक्यातील, जिल्ह्यातील राजकीय व सामाजिक क्षेत्रातील मान्यवर उपस्थित राहणार असून कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी पशु गोवर्धन गिरधारी मंडळ पंच कमिटी अंजनगाव चे अध्यक्ष चिंधू रोटके ,उपाध्यक्ष धनराज पोटफोडे, ज्ञानेश्वर कडव, कोषाध्यक्ष सुरेश कहालकर ,सहकोषाध्यक्ष मनोहर कडव, सचिव वासुदेव वैद्य, सहसचिव गोपाल पोटफोडे, सदस्य गण सर्वश्री मोहन ढोणे, बंडू पोटफोडे, सुरेश पोटफोडे, ज्ञानदेव ढोबळे, दामू कडू, शेषराव कातुरे, बाळू जगनाडे, जितेंद्र सपाटे, सुनील जगनाडे, अशोक ठाकरे, देविदास पोटफोडे ,गजानन कडव ,मयूर शामदेव कुकडे परिश्रम घेत असून समस्त ग्रामवासी सहकार्य करत आहेत.

कामगार केसरी रुईकर स्मृती व्याख्यान शनिवारी

बँकांचे खाजगीकरण आणि जनतेच्या पैशाची सुरक्षा या विषयावर देविदास तुळजापूरकर यांचे मार्गदर्शन

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

कामगार केसरी रुईकर स्मृती व्याख्यानमालेअंतर्गत २०२६ चे व्याख्यान शनिवार, १४ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ५.३० वाजता हिंदी मोर भवन, झाशी राणी चौक येथील अर्पण सभागृहात आयोजित करण्यात आले आहे. यावेळी बँकिंग एज्युकेशन ट्रेनिंग रिसर्च अकादमी आणि पर्याय फाउंडेशनचे चेअरमन देविदास तुळजापूरकर हे 'बँकांचे खाजगीकरण आणि जनतेच्या पैशाची सुरक्षा' या विषयावर मार्गदर्शन करणार आहेत. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. श्रीनिवास खांदेवाले राहणार आहेत. बँकांचे खाजगीकरण, सार्वजनिक बँकांची भूमिका आणि सर्वसामान्य जनतेच्या ठेवींच्या सुरक्षेसंदर्भातील महत्त्वाच्या मुद्द्यांवर या व्याख्यानातून प्रकाश टाकण्यात येणार आहे. नागरिकांनी आणि विचारवंतांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा गट-ब राजपत्रित अधिकारी संघटनेची नवीन कार्यकारिणी जाहीर

अध्यक्षपदी निलेश बोंगिरवार, तर प्रमुख कार्यवाहपदी शिवाजी खराडे यांची बिनविरोध निवड



दै. सिंहवाणी वृत्त, अमरावती

महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा गट-ब राजपत्रित अधिकारी संघटनेची वार्षिक सर्वसाधारण सभा नुकतीच अमरावती येथील हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाच्या श्री पुसतकर सभागृहात उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. या सभेत संघटनेच्या नवीन केंद्रीय कार्यकारिणीची घोषणा करण्यात आली. यामध्ये अध्यक्षपदी नागपूरचे निलेश बोंगिरवार, तर प्रमुख कार्यवाहपदी पुण्याचे शिवाजी खराडे यांची सर्वानुमते बिनविरोध निवड करण्यात आली. शासनाच्या विविध विभागांसह महामंडळांमध्ये वित्तीय नियोजन, पारदर्शकता आणि आर्थिक शिस्त राखण्यामध्ये वित्त व लेखा सेवा संवर्गातील अधिकाऱ्यांची भूमिका महत्त्वपूर्ण असते. या पार्श्वभूमीवर संवर्गातील विविध प्रलंबित प्रश्न, सेवाविषयक अडचणी तसेच अधिकारी-कर्मचाऱ्यांचे हक्क याबाबत सभेत सविस्तर चर्चा करण्यात आली.

नवीन केंद्रीय कार्यकारिणीमध्ये अध्यक्षपदी निलेश बोंगिरवार (नागपूर), प्रमुख कार्यवाहपदी शिवाजी खराडे (पुणे), राज्य समन्वयकपदी बालाजी परदेशी, उपाध्यक्षपदी राहुल रत्नपारखी व अण्णा भडगे, कार्यवाहपदी प्रज्ञा कांबळे व प्रमोद पोहकर, कोषाध्यक्षपदी संतोष ताटे, तर महिला समन्वयकपदी विद्या चहारे यांची निवड करण्यात आली. नवीन कार्यकारिणीच्या निवडीबद्दल राज्यभरातील वित्त व लेखा सेवा संवर्गातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करून त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. शासनाच्या विकासात्मक धोरणांच्या अंमलबजावणीला गती देतानाच वित्त व लेखा सेवा संवर्गातील सर्व घटकांचे प्रश्न सोडविण्यासाठी आणि त्यांच्या हिताचे संरक्षण करण्यासाठी संघटना सदैव कटिबद्ध राहील, असा विश्वास नवनिर्वाचित कार्यकारिणीने व्यक्त केला. अशी माहिती सहदेव चव्हाण यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली.

शेतातील विंधन विहिरींवरील बंदी १५ डिसेंबरपर्यंत शिथील

झाडे जगविण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची घोषणा, लोहारी सावंगा येथे लोकप्रतिनिधींची संवाद

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर



सध्याची दुष्काळी स्थिती पाहता विशेष बाब म्हणून जिथे गरज आहे तिथे झाडे जगविण्यासाठी केवळ शेतीकामाकरीता विंधन विहिरींवरील बंदी येत्या १५ डिसेंबर पर्यंत उठविण्यात येत असल्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज केली. नागपूर जिल्ह्यातील नरखेड तालुक्यातील लोहारी सावंगा येथे आज सकाळी मुख्यमंत्र्यांनी विविध ग्रामपंचायत सरपंचांशी संवाद साधला. त्यावेळी त्यांनी ही घोषणा केली.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी शनिवारी या गावात मुक्काम करून येथेच दिवाळी साजरी केली. आज सकाळी पुढील दौऱ्यावर निघण्यापूर्वी त्यांनी तालुक्यातील लोकप्रतिनिधींशी संवाद साधला. यंदा दुष्काळामुळे जलसंकट असून, शेतातील पिके मातीमोल होण्याची भीती लोकप्रतिनिधींनी व्यक्त केली. त्यावर बोलताना मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, विंधन विहिरींचे खोलीकरण किंवा नवीन विंधन विहिरी करणे यावरील बंदी उठविणे सरकारसाठी थोडे अडचणीचे आहे, मात्र विशेष बाब म्हणून हा निर्णय घेण्यात येत आहे. मात्र यासाठी शेतकऱ्यांना परवानगी घ्यावी लागेल तसेच बंदी उठविण्याचा निर्णय सरसकट नाही, झाडे जगविण्यासाठी आवश्यक तेथेच परवानगी असेल, असेही मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले. त्याचवेळी नागरिकांनी पाण्याची बचत तसेच पुनर्भरण करावे, असे आवाहनही मुख्यमंत्र्यांनी केले.

या परिसरात मोठ्या प्रमाणात पशुधन आहे, मात्र पशू दवाखाने नाही, अशी व्यथा अनेक प्रतिनिधींनी मांडली. त्यावर गुरांच्या दवाखान्यांबाबत पाहणी करून लगेच निर्णय घेण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी यावेळी जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना दिले.

जलजीवन मिशनच्या कामांबाबत मुख्यमंत्री म्हणाले की, पुरेसे पैसे न मिळाल्याने काही कामे अपूर्ण आहेत, मात्र आता ती प्राधान्याने पूर्ण केली जात आहेत. जेथील कामे ७५ टक्क्यांच्यावर पूर्ण झाली आहेत, तेथे तातडीने निधी उपलब्ध करून ती कामे पूर्ण केली जातील. अन्य ठिकाणची कामेही टप्पात पूर्ण केली जातील, असे याप्रसंगी मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी स्पष्ट केले.

शेतातील पिकांचे वन्य प्राण्यांकडून होत असलेले नुकसान गंभीर आहे. त्यासाठी तार कुंपण योजना अधिक व्यापक करण्यात येईल. जंगलाला लागून असलेल्या शेतांना यात विशेष प्राधान्य देण्यात येईल, असेही त्यांनी सांगितले. दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर जलसाठ्यामधील गाळ काढून ती माती शेतीत टाकण्याची कामे हाती घेण्यात आली असल्याचे त्यांनी यावेळी नमूद केले.

ब्लॅकमेल करणारांना तुरुंगात टाकणार

तालुक्यातील काही महिला सरपंचांनी पत्रकार असल्याचे सांगून पैशाची मागणी करण्यात येत असल्याची तक्रार मुख्यमंत्र्यांसमोर मांडली. ब्लॅकमेल करून पैशाची मागणी केली जात असल्यास संबंधित व्यक्तीला तुरुंगात टाकण्यात येईल असेही मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी स्पष्ट केले. पोलिस विभागाने याबाबत तातडीने कार्यवाही करण्याचे निर्देश त्यांनी दिले.

उपसरपंच मनिष काटोले यांच्या संवेदनशील पुढाकाराला यश; २८ वर्षांच्या संघर्षानंतर भूमिहीन दिव्यांग संदीप गिऱ्हाळेला मिळणार न्याय!

दै. सिंहवाणी वृत्त, नरखेड



दुष्काळी परिस्थितीमुळे शेतकऱ्यांच्या समस्या जाणून घेण्यासाठी आणि त्यांच्यासोबत दिवाळी साजरी करण्यासाठी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच महसूलमंत्री व नागपूर जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे हे लोहारी सावंगा येथे आले होते. या वेळी उपस्थित अनेक पदाधिकारी व शेतकऱ्यांनी गावातील दुष्काळी परिस्थिती, पाणीटंचाई आणि इतर सार्वजनिक समस्या मांडल्या; परंतु गट ग्रामपंचायत घोगरा-लोहारा-जुनेवानीचे उपसरपंच मनिष वासुदेवराव काटोले यांनी एका भूमिहीन परिवारातील दिव्यांग व्यक्तीच्या हक्काचा व न्यायाचा अत्यंत संवेदनशील विषय त्यांच्यासमोर मांडून सर्वांचे लक्ष वेधले.

या निवेदनाची तात्काळ दखल घेत महसूलमंत्री चंद्रशेखरजी बावनकुळे यांनी दिव्यांग संदीप गिऱ्हाळे याला स्वतः पुढाकार घेऊन कृत्रिम पाय बसवून देण्याचा शब्द दिला आहे, तर प्रशासनाने सर्व शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्याचे ठोस आश्वासन दिले आहे.

२८ वर्षांचा प्रदीर्घ संघर्ष

१९९८ चा भीषण अपघातः २६ जून १९९८ रोजी गावातील एका नागरिकाने नदीकाठचे अंजन वृक्ष तोडताना त्याची फांदी विजेच्या तारांवर कोसळली. यामुळे विजेचा खांब तुटून तिथे खेळत असलेल्या संदीप गिऱ्हाळे याच्या पायावर पडला. या अपघातात त्याच्या पायाचे दोन तुकडे झाले आणि नागपूरच्या मेयो रुग्णालयात शस्त्रक्रिया करून त्याचा पाय कापावा लागला. तेव्हापासून संदीप कायमचा दिव्यांग झाला.

तांत्रिक अडचणींमुळे योजना बंदः २०१२ मध्ये संदीपला संजय गांधी निराधार योजनेअंतर्गत मानधन सुरू झाले होते. मात्र, नंतर आधार कार्ड अनिवार्य झाल्यानंतर 'बायोमेट्रिक मिसमॅच'च्या तांत्रिक अडचणीमुळे त्याचे आधार कार्ड निघू शकले नाही. परिणामी दिव्यांग प्रमाणपत्राचे नूतनीकरण रखडले आणि निराधार योजनेचे पैसे, रेशनचे धान्य व इतर सर्व शासकीय लाभ पूर्णपणे बंद झाले.

उपसरपंच मनिष काटोले यांचा निर्धार आणि सतीश रेवतकर यांचे सहकार्य

संदीपला न्याय मिळावा यासाठी उपसरपंच मनिष काटोले यांनी त्याला दोनदा नागपूरला नेले होते, तसेच जिल्हाधिकाऱ्यांना निवेदनही दिले होते. मात्र, यश न आल्याने संदीपला स्वखर्चाने मुंबई येथील आधार केंद्राच्या मुख्यालयात नेण्याची तयारी त्यांनी केली होती. दरम्यान, पक्षांतर्गत कारणास्तव काटोले यांनी एक दिवस आधीच भाजप जलालखेडा मंडळ उपाध्यक्ष पदाचा राजीनामा दिला होता. परंतु, मुख्यमंत्री आणि महसूलमंत्री गावात येणार असल्याचे समजताच त्यांनी पद बाजूला ठेवून संदीपच्या न्यायासाठी पुन्हा पुढाकार घेतला. या वेळी महसूलमंत्र्यांचे निकटवर्तीय सतीश रेवतकर यांनी मोलाचे मार्गदर्शन व सहकार्य केल्यामुळे मनिष काटोले यांना महसूलमंत्र्यांची भेट घेणे आणि सविस्तर चर्चा करणे शक्य झाले.

अनेक गरजू लोकांना ते सातत्याने सार्वजनिक कामांतून मदत करत असतात. त्यांचे उच्च शिक्षण MSW (CD - समाजकार्य पदव्युत्तर पदवी) मध्ये झाले असून, ते 'नीती आधार फाउंडेशन, महाराष्ट्र राज्य' या संस्थेचे सक्रिय सदस्य देखील आहेत. त्यांच्या या उच्च शिक्षणाची आणि सामाजिक जाणिवेची झलक या संवेदनशील पुढाकारातून पुन्हा एकदा दिसून आली असून, सर्व स्तरांतून त्यांचे कौतुक होत आहे.

असोसिएशन ऑफ युनिव्हर्सिटी अँड कॉलेज सुपर अन्युएटेड टीचर्सतर्फे अभिजित वंजारी यांचा सत्कार



दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

पदवीधर मतदार संघाच्या निवडणुकीत आमदार म्हणून निवडून आलेले अभिजित वंजारी यांचा सत्कार सोहळा असोसिएशन ऑफ युनिव्हर्सिटी अँड कॉलेज सुपर अन्युएटेड टीचर्सच्यावतीने श्री संत संताजी आर्ट गॅलरी, जगनाडे चौक येथे आयोजित करण्यात आला होता. सत्कार सभेच्या अध्यक्षस्थानी प्राध्यापक डॉ.श्रीनिवास खांदेवाले, तर स्वागताध्यक्ष प्रा. प्रभुजी देशपांडे होते. प्रमुख अतिथी म्हणून प्रा.डॉ.माहुरे, विनायकराव तुपकर, प्रा.विजया मारोतकर उपस्थित होत्या. प्रा. प्रभुजी देशपांडे यांनी स्वागतपर भाषण दिले. त्यानंतर अक्सूर्सट संघटनेचे अध्यक्ष डॉ. अरविंद शेंडे यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

उपस्थित सर्व मान्यवरांनी अभिजीत वंजारी यांना शाल पुष्पगुच्छ आणि धन्वंतरी देवतेची मूर्ती सप्रेम भेट दिली. अक्सूर्सट केंद्रीय कार्यकारिणीचे अध्यक्ष डॉ. वाव्हूळ, सचिव डॉ जे.एम.मंत्री व कोषाध्यक्ष प्रा. एस बी नाफडे संभाजीनगर यांनी पाठविलेल्या ठरावाचे सभेमध्ये वाचन करण्यात आले. त्यांनी अभिजीत वंजारी यांच्या कामाचे कौतुक करून त्यांचे हार्दिक अभिनंदन केले. तसेच पुढील वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या. या संपूर्ण कार्यक्रमाचे संचालन डॉ. पुष्पा तायडे यांनी तर आभार प्राचार्य डॉ. अडगांवकर यांनी मानले.

महावितरणची 'अभय योजना': थकबाकीदार वीज ग्राहकांसाठी सुवर्णसंधी!

पूर्ण व्याजमाफीसह भरघोस सवलतीचा लाभ घ्या

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर



दिवाळीच्या मंगलमय पर्वावर आणि नवीन वर्षाच्या सुरुवातीला महावितरणने आपल्या सर्व बिगरकृषी वीज ग्राहकांसाठी एक अत्यंत दिलासादायक व महत्त्वाची 'अभय योजना २०२६-२७' सुरू केली आहे. ज्या ग्राहकांचा वीजपुरवठा विविध कारणांमुळे खंडित झाला आहे, अशा ग्राहकांना त्यांच्या जुन्या थकबाकीच्या विळख्यातून कायमची मुक्ती मिळवून देण्यासाठी ही योजना एक सुवर्णसंधी ठरत आहे. या योजनेच्या माध्यमातून ग्राहकांना केवळ थकबाकी भरण्याची सुलभ संधीच मिळत नाही, तर हजारो रुपयांची बचत करण्याची उत्कृष्ट संधीही उपलब्ध करून देण्यात आली आहे.

महावितरणच्या या लोककल्याणकारी योजनेअंतर्गत ३१ मार्च २०२६ पर्यंत ज्या उच्च व लघुदाब वर्गवारीमधील घरगुती, व्यावसायिक, औद्योगिक व इतर बिगरकृषी ग्राहकांचा वीजपुरवठा कायमस्वरूपी खंडित झाला आहे, तसेच ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत तात्पुरता वीजपुरवठा खंडित झालेला आहे, अशा सर्व पात्र ग्राहकांना या योजनेचा थेट लाभ घेता येणार आहे. याशिवाय महावितरण डिस्ट्रिब्यूशन फ्रेंचायजीमधील ग्राहकांसाठीही ही योजना खुली करण्यात आली आहे.

योजनेची प्रमुख वैशिष्ट्ये व आकर्षक लाभः

या योजनेतील सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे, थकबाकीदारांच्या संपूर्ण बिलावरील व्याज आणि विलंब आकाराची रक्कम तब्बल १०० टक्के माफ केली जाणार आहे. त्यामुळे ग्राहकांच्या मूळ रकमेव्यतिरिक्त अतिरिक्त आर्थिक भार पूर्णपणे संपुष्टात येणार आहे. योजना सुरू झाल्यापासून १५ डिसेंबरपर्यंत मूळ थकबाकीचा एकरकमी भरणा करणाऱ्या ग्राहकांसाठी विशेष सवलत जाहीर करण्यात आली आहे. यात लघुदाब घरगुती व व्यावसायिक ग्राहकांना ३ वर्षांपर्यंत वीजजोडणी खंडित असल्यास १० टक्के आणि ३ वर्षांपेक्षा अधिक कालावधीपासून वीजपुरवठा खंडित असल्यास तब्बल २० टक्के घसघशीत सवलत मिळणार आहे. इतर सर्व लघु व उच्चदाब ग्राहकांना अनुक्रमे १० टक्के व १५ टक्के सूट देण्यात येत आहे. ग्राहकांना आपली मूळ थकबाकी भरण्यासाठी एकाच वेळी किंवा हप्त्यांची सोयीस्कर सुविधा देण्यात आली आहे. लघुदाब ग्राहकांना ५० टक्के डाऊन पेमेंट भरून उर्वरित रकमेसाठी ६ समान व्याजमुक्त मासिक हप्ते, तर उच्चदाब ग्राहकांना ३ ते ६ व्याजमुक्त हप्त्यांची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

प्रत्यक्ष अनुभवातून मिळालेला मोठा दिलासाः

या योजनेच्या प्रारंभीच नागपूर आणि वर्धा जिल्ह्यातील ग्राहकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला आहे. नागपूरमधील गांधीबाग विभागांतर्गत बिनाकी उपविभागातील एका ग्राहकाचे ४८७९६ रुपयांची थकबाकी असलेले बिल होते. या योजनेमुळे त्यांना व्याजापोटी १६०८८ रुपये, विलंब आकारापोटी ४०३ रुपये आणि 'अर्ली बर्ड सवलत' म्हणून ६४६० रुपयांची घसघशीत सूट मिळाली. अशा प्रकारे एकूण २२९०६ रुपयांची भरघोस बचत होऊन त्या ग्राहकाने केवळ २५८५० रुपयांचा भरणा करून आपल्या थकबाकीतून कायमची मुक्ती मिळवली आहे.

अर्जाची अत्यंत सुलभ ऑनलाईन प्रक्रियाः

ग्राहकांना या योजनेचा लाभ घेण्यासाठी संपूर्ण अर्ज प्रक्रिया अत्यंत सुलभ आणि ऑनलाईन ठेवण्यात आली आहे. घरबसल्या महावितरणच्या अधिकृत ऑनलाईन पोर्टल किंवा मोबाईल ॲपद्वारे अगदी सहजतेने अर्ज करता येणार आहे. ही योजना येत्या १५ जानेवारी २०२७ पर्यंत लागू राहणार आहे.

तरी नागपूर, वर्धासह संपूर्ण महाराष्ट्रातील सर्व संबंधित थकबाकीदार वीज ग्राहकांनी या सुवर्णसंधीचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा, आपले वीज बिल सुलभतेने व सवलतीत भरून महावितरणच्या या लोककल्याणकारी योजनेचा लाभ घ्यावा आणि पुन्हा एकदा अखंड व सुरळीत वीजसेवेचा आनंद घ्यावा, असे आवाहन महावितरणतर्फे करण्यात आले आहे.

थोडक्यात

रोटरी बालोद्यानमध्ये ११ रोजी रंगणार 'दिवाळी पहाट'

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

रोटरी क्लब नागपूर वेस्टच्या वतीने दीपावलीनिमित्त 'दिवाळी पहाट' या विशेष सांगीतिक कार्यक्रमाचे आयोजन बुधवार, ११ नोव्हेंबर रोजी सकाळी ६ वाजता प्रतापनगर येथील रोटरी बालोद्यान येथे करण्यात आले आहे. कार्यक्रमाचे संयोजक गजानन रानडे असून या कार्यक्रमात अमर कुळकर्णी, सुरेश अय्यर, निधी रानडे, आनंद मास्ते, प्रमोद बावने, महेंद्र वाटूळकर, सोहम रानडे आणि आदित्य बोडे हे कलाकार गायन व वादन सादर करणार आहेत. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व निवेदन स्मिता महाजन करणार आहेत.

या उपक्रमांतर्गत नागरिकांसाठी रक्तातील साखरेची तपासणी तसेच बीएमडी (हाडांची घनता) मोजण्याची प्राथमिक तपासणी मोफत करण्यात येणार आहे. संगीत आणि आरोग्य यांचा सुरेख संगम असलेल्या या उपक्रमाचा नागरिकांनी व संगीतप्रेमींनी मोठ्या संख्येने लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

इंडियन मेडिकल असोसिएशन सावनेरतर्फे दिवाळी पहाट कार्यक्रम उत्साहात साजरा



दै. सिंहवाणी वृत्त, सावनेर

इंडियन मेडिकल असोसिएशन (आय. एम. ए.) सावनेर शाखेतर्फे दिवाळीच्या पारंपरिक स्वागताचा उपक्रम म्हणून दिवाळी पहाट कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात आय. एम. ए. चे ज्येष्ठ सदस्य डॉ. विजय धोटे आणि डॉ. ज्योत्स्ना धोटे यांच्या शुभहस्ते दिपप्रज्वलनाने संपन्न झाली या प्रसंगी आय. एम. ए. सावनेरच्या अध्यक्षा डॉ. स्मिता भुडे यांनी उपस्थितांना दिवाळीच्या शुभेच्छा देत मार्गदर्शन केले. त्यांनी आपल्या संदेशात वैद्यकीय सेवा ही मानवतेची खरी पूजा असल्याचे सांगितले. वैद्यकीय क्षेत्रातील सर्व घटकांनी परस्पर सहकार्याने समाजहितासाठी कार्य करावे, असे आव्हानही त्यांनी केले. कार्यक्रमाचे विशेष आकर्षण म्हणजे वैद्यकीय क्षेत्रातील विविध उपचारपद्धतीचे प्रतिनिधी एकत्र आले होते. नीमा शाखा सावनेर अध्यक्ष डॉ. छत्रपती मानापूरे विशेष अतिथी म्हणून प्रामुख्याने उपस्थित होते

यावेळी मोठ्या संख्येने आयएमचे सदस्य डॉ. विजय घटे, सौ. नंदा घटे, डॉ. अशोक जयस्वाल , सौ. रजनी मानकर डॉ. अशोक देशमुख, डॉ. विनोद बोकडे, डॉ. करुणा बोकडे, डॉ. रवी ढवळे. डॉ. निलेश कुंभारे, डॉ. सोनाली कुंभारे, डॉ. हेमंत पाटील, डॉ. उमेश जिवतोडे, डॉ. प्राची भगत, डॉ. आशीष चांडक, डॉ. रेणुका चांडक, डॉ. विलास मानकर, डॉ. गौरी मानकर, डॉ. परेश झोपे, सौ. चित्रा झोपे डॉ. अमित बाहेती, डॉ. अंकिता बाहेती, डॉ. शिवम पुनियानी, डॉ. स्वाती पुनियानी, डॉ. प्रीतमकुमार निचत, डॉ. मयूर डोंगरे, डॉ. मिनल डोंगरे, डॉ. विशाल महंत, डॉ. हर्षदा महंत, डॉ. नितीन पोटोडे, डॉ. मोनाली पोटोडे, डॉ. रश्मी भगत आणि सतीश भुडे डॉ उपस्थित होते. तर नीमा शाखा सावनेर आणि होमियोपैथिक डॉक्टर्स असोसिएशनच्या वतीने सदस्य डॉ कृष्णरावजी भगत, डॉ संजय दोरखंडे, डॉ मंजुषा दोरखंडे, डॉ रोशन निनावे, डॉ आकांक्षा निनावे, डॉ. अनुप जयस्वाल, डॉ प्रशांत राजपूत, श्रीमती राजपूत, डॉ स्वप्निल काले , डॉ श्रेया काले, डॉ नीरज दुबे , श्रीमती दुबे, डॉ श्रद्धा मानापुरे, डॉ स्वप्निल कांबे, डॉ. विशाल पांडे, डॉ. पायल पांडे, डॉ. शशांक कूथे, डॉ. सौ. कुथे मॅडम आणि विनोद बोबडे उपस्थित होते. आय. एम. ए., नीमा शाखा सावनेर आणि होमियोपैथिक डॉक्टर्स असोसिएशनचे सर्व सदस्य या कार्यक्रमात सहभागी झाले होते. दिवाळी पहाट कार्यक्रमात अभंग, भजन आणि गीतांच्या सुरेल सादरीकरणाने वातावरण भक्तिमय आणि सांस्कृतिक रंगात न्हाऊन निघाले. कार्यक्रमाचे आयोजन अत्यंत शिस्तबद्ध व यशस्वीपणे पार पडले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन आयएमचे सचिव डॉ. प्रविण चव्हाण यांनी केले.

वंचितांच्या निवारा केंद्रांना मदतीचा हात, पिरॅमिड गोल्ड सोसायटीतर्फे वस्त्रदान उपक्रम



दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

बेसा-पिपळा परिसरातील पिरॅमिड गोल्ड सोसायटीच्या वतीने सामाजिक बांधिलकी जपत वस्त्रदान उपक्रम राबविण्यात आला. सोसायटीतील रहिवाशांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत मोठ्या प्रमाणात कपडे जमा केले. संकलित करण्यात आलेल्या कपड्यांचे आस्था पुरुष निवारा केंद्र, कॉटन मार्केट आणि शांती सदन महिला निवारा केंद्र, सदर येथे दान करण्यात आले. आशा उपक्रमांतून समाजातील गरजू घटकांना मदत करण्यासोबतच सामाजिक एकोपा आणि माणुसकीची भावना अधिक दृढ होत असल्याचे यावेळी अधोरेखित करण्यात आले.

या उपक्रमातून गरजू पुरुष आणि महिलांना कपड्यांच्या माध्यमातून मदतीचा हात देण्यात आला. रहिवाशांच्या छोट्याशा योगदानातून गरजूंच्या चेहऱ्यावर आनंद फुलविण्याचा प्रयत्न या उपक्रमातून करण्यात आला. सामाजिक जाणीव आणि सहकार्याची भावना जोपासणाऱ्या या उपक्रमाचे परिसरात कौतुक होत आहे. या उपक्रमासाठी विजय सोनटक्के, वीरेंद्र जोगी, दीपक पसारकर, गौतम नागरे यांच्यासह पिरॅमिड गोल्डचे रहिवासी व निवारा केंद्राच्या कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.

शेतीच्या बांधावर जाऊन मुख्यमंत्र्यांनी केली शेतातील पिकांची पाहणी

सोनेगाव रिठी व कोहळी येथील शेतकऱ्यांनी मांडल्या व्यथा, कापूस व तूर पिकांच्या नुकसानी संदर्भात शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर पावसाअभावी शेतातील कापूस व तुरीची झाडे सुकत असून अशा परिस्थितीत कापसाची शेती करणारा शेतकरी हवालदिल झाला आहे. अशा शेतकऱ्यांना तातडीने आवश्यक मदत देण्यात येईल, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कळमेश्वर तालुक्यातील कोहळी या गावातील बाबुराव काळे या शेतकऱ्याला दिली

दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांच्या व्यथा समजून घेण्यासाठी व त्यांच्यासोबत दिवाळी साजरी करण्यासाठी लोहारी सावंगा या गावाला मुक्काम केला होता. आज मुख्यमंत्र्यांनी शेतकऱ्याच्या बांधावर जाऊन शेतीची पाहणी केली तसेच दुष्काळी परिस्थितीचा सामना करण्यासाठी शासन सोबत असल्याचे यावेळी त्यांनी सांगितले.

लोहारी सावंगा येथून सकाळी सोनेगाव येथे येथील दिलीप सरोदे या शेतकऱ्यांच्या शेतात जाऊन दुष्काळामुळे कापूस पिकांच्या सद्यस्थितीची माहिती घेतली. पावसाअभावी कापसाची वाढ झाली नाही तसेच कापसाची बोंड सुद्धा फुटली नाहीत त्यामुळे शेतकऱ्यांसमोर अडचणी निर्माण झाल्या आहेत. अशा परिस्थितीत खचून न जाता शेतकऱ्यांना मदत करण्यात येत असल्याचे यावेळी मुख्यमंत्र्यांनी सांगितले. दुष्काळामुळे शेती नष्ट झाली असतानाच वन्य प्राण्यांचा मोठ्या प्रमाणात त्रास असल्यामुळे सौर कुंपण उपलब्ध करून द्यावे अशी



मागणी यावेळी दिलीप सरोदे या शेतकऱ्यांनी केली. वन्य प्राण्यांपासून पिकांच्या संरक्षणासाठी सौर कुंपणाची योजना प्रभावीपणे राबविण्यात येईल अशी ग्वाही यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कळमेश्वर तालुक्यातील बाबुराव काळे यांच्या शेताला भेट दिली तसेच कापूस व तुरीच्या पिकांची पाहणी केली. दीर्घ काळापासून पाऊस न पडल्यामुळे पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. पिकांच्या नुकसानी संदर्भात शेतकऱ्यांना तातडीने पाच हजार रुपयाची मदत दिली आहे उर्वरित मदतही शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करण्यात येईल. कुणीही शेतकरी मदतीपासून वंचित राहणार नाही अशी ग्वाही मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिली.

कोहळीच्या शेतकऱ्यांना दिलासा

शेतकऱ्यांना दुष्काळी मदत देताना अँग्री स्टॅकची नोंदणी आवश्यक आहे परंतु दुष्काळी परिस्थितीत या मदतीसाठी ऑनलाईन नोंदणी ऐवजी ऑफलाइन नोंदणी करण्याची सवलत देण्यात आली असल्याची माहिती महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी यावेळी दिली. दुष्काळी परिस्थितीमध्ये आवश्यकतेनुसार धान्य उपलब्ध होत आहे परंतु ज्या शेतकऱ्यांकडे शिधापत्रिका नाही अशा शेतकऱ्यांना प्राधान्याने नोंदणी करून त्यांनाही लाभ देण्यात यावा अशी सूचना यावेळी मुख्यमंत्री श्री देवेंद्र फडणवीस यांनी केली.

शेतीच्या नुकसानी संदर्भातील पाहणी दौऱ्यात आमदार चरण सिंग ठाकूर, राजीव पोतदार यांचे सह शेतकरी सर्वश्री वसंतराव चापले, संदीप सरोदे, दिनेश दापले, सरपंच बिपीन चापले, नलिनी सतीश रेवतकर, मनोहर कुंभारे आदी शेतकरी तसेच जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक महामुनी आदी अधिकारी उपस्थित होते.

विशेष लोक अदालत २१ नोव्हेंबर रोजी

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर – जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या वतीने २१ नोव्हेंबर रोजी प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष सलमान एम. आझमी यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष लोक अदालतीचे आयोजन करण्यात आले आहे. त्यामध्ये जिल्ह्यातील हजारो न्यायालयीन प्रलंबित व दाखलपूर्व प्रकरणे तडजोडीसाठी ठेवण्यात येणार आहेत. सर्व संबंधित पक्षकारांनी लोक अदालतीमध्ये मोठ्या संख्येने सहभागी होऊन लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव न्यायाधीश प्रविण उन्हाळे यांनी केले आहे. लोक अदालतीचा मुख्य उद्देश न्यायालयात प्रलंबित असलेली प्रकरणे, दाखलपूर्व प्रकरणे त्वरीत निकाली काढून पक्षकारांना त्वरीत न्याय देणे हा आहे. जिल्ह्यात न्यायालयांमध्ये प्रलंबित प्रकरणांची व दाखलपूर्व प्रकरणांमधील तडजोड योग्य प्रकरणांची छाननी करुन आपसी समझोत्याकरीता प्रकरणे विशेष लोक अदालतीमध्ये ठेवण्यात येत असतात. विशेष लोक अदालतीमध्ये प्रलंबित प्रकरणासाठी संबंधित न्यायालयात अर्ज सादर करावा आणि दाखलपूर्व प्रकरणासाठी जिल्हा विधी सेवा प्राधिकरण तसेच तालुका विधी सेवा समितीच्या कार्यालयाशी संपर्क साधावा.

बाजारपेठा, गर्दीची ठिकाणे तसेच इमारतीवर फटाके, स्काय शॉट, रॉकेट उडविण्यास निर्बंध

आगीच्या वाढत्या घटनांमुळे आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचा तडकाफडकी निर्णय

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर नागपुरात लक्ष्मीपूजनाच्या दिवशी २४ तासात ४२ आगीच्या घटना घडल्यानंतर मनपाच्या शहरी आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण (यूडीएमए) शहरात हवेत उडणारे फटाके, स्काय शॉट, रॉकेट, व तत्सम फटाके इमारतीच्या गच्चीवर, टेरेस, बाल्कनी, झोपडपट्टी, बाजारपेठा, गर्दीचे ठिकाणी, वाहनतळ तसेच तत्सम ठिकाणी फोडण्यास आजपासून (ता. ९ नोव्हेंबर) ३० नोव्हेंबर पर्यंत पूर्णतः निर्बंध घातले आहे. यासंदर्भात यूडीएमएचे अध्यक्ष तथा आयुक्त डॉ. विपीन यांनी आदेश जारी केला आहे.

नागपूर शहरात रविवारी शहरात अवघ्या २४ तासात ४२ पेक्षा अधिक आगीच्या घटना घडल्या. यात मोठ्या प्रमाणावर सार्वजनिक मालमत्तेची हानी झाली. या आगीसाठी आकाशात उडणारे रॉकेट, स्काय शॉटमधून निघणाऱ्या ठिणग्यांमधून निघणाऱ्या ज्वलनशील पदार्थ कारणीभूत ठरल्याचे निदर्शनास आले आहे. हे फटाके इमारतींच्या छतावर, गच्चीवर, झोपडपट्टीवर, भंगारची दुकाने, गोदाम, पेट्रोल पंप, वाहनांवर पडल्यास मोठी आग लागून मोठ्या प्रमाणावर जिवीतहानी व वित्तहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

या ठिकाणांवर घातले निर्बंध

ही शक्यता लक्षात घेऊन आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ (सुधारणा) अंतर्गत व मुख्य अग्निशमन अधिकार्यांकडून मिळालेल्या अहवालानुसार या काळात आगीच्या घटनांमध्ये मोठ्या प्रमाणावर वाढ झाल्याचे निदर्शनास आले आहे. नागपूर शहराची भौगोलिक रचना, गगनचुंबी इमारती, दाट लोकवस्ती, झोपडपट्ट्या, व्यावसायिक आस्थापने, गोदामे व ज्वलनशील पदार्थांची साठवणूक असलेली ठिकाणे विचारात घेऊन अशा प्रकारच्या फटाक्यांमुळे उद्भवणाऱ्या घटनांमधून मनपाच्या अग्निशमन विभागापुढे मोठे आव्हान उभे राहू शकते. ही वस्तुस्थिती लक्षात घेऊन नागरी आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे (यूडीएमए) अध्यक्ष व आयुक्त डॉ. विपीन यांनी सार्वजनिक मालमत्तेचे संरक्षण करणे, संभाव्य आगीच्या दुर्घटना टाळणे, सार्वजनिक सुरक्षेच्या दृष्टीने तात्काळ प्रतिबंधात्मक आदेश जारी करण्यात येत असल्याचे या आदेशात म्हटले. या आदेशानुसार मनपाच्या हद्दीतील इमारतींची गच्ची, टेरेस व बाल्कनी, रेफ्युजी एरिया, अरुंद रस्ते, झोपडपट्टी, दाटीवाटीचे रहिवाशी क्षेत्र, बाजारपेठा, वाहनतळ, या परिसरात फटाके, स्काय शॉट, रॉकेट उडविण्यास बंदी घातली आहे.

हे निर्बंध ९ नोव्हेंबरपासून ३० नोव्हेंबर २०२६ पर्यंत शहरात लागू राहणार आहे. या आदेशाचे नागपूर पोलीस आयुक्तालय, मनपाचा अग्निशमन विभागाने या आदेशाची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी, असे या आदेशात म्हटले आहे.

या आदेशाचे उल्लंघन करणाऱ्यांविरुद्ध नागपूर पोलिसांनी प्रचलित कायद्यानुसार कारवाई करावी, या आदेशाचे भंग करणाऱ्याविरुद्ध आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ च्या कलम ५१ ते ६० व भारतीय न्याय संहिता २०२३ च्या कायद्यातील तरतुदीनुसार दंडात्मक व कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असे या आदेशात नमूद आहे.

२५ कुटुंबांचा सामूहिक सुवर्ण, अमृत आणि सहस्रचंद्र दर्शन सोहळा थाटात संपन्न

ज्येष्ठ नागरिक अभिष्टचिंतन सोहळा थाटात संपन्न



दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

एकाच वेळी २५ कुटुंबान्नी सामूहिक सुवर्ण, अमृत आणि सहस्रचंद्र दर्शन सोहळा संपन्न केला. "ज्येष्ठ नागरिक महामंडळ विदर्भ "आणि "सनातन सांस्कृतिक कला व क्रीडा परिषद "यांनी संयुक्त विद्यमाने हा आगळा वेगळा कार्यक्रम आयोजित केला. मंगल सनई वादनाने सोहळ्याची सुरुवात झाली. दक्षिण नागपूरचे आमदार मोहन मते यांनी उपस्थित राहून सर्व ज्येष्ठ नागरिकांना दिवाळीच्या शुभेच्छा दिल्या तसेच त्यांच्या पुढील आयुष्यासाठी निरामय आरोग्य आणि दीर्घायुष्याच्या सदिच्छा व्यक्त केल्या. वैदिक पुरोहित माधव सिरास आणि सोमेश जोशी यांच्या मंत्रोच्चारात धार्मिक विधींना प्रारंभ झाला. सर्वप्रथम नक्षत्र हवन, पुण्याहवाचन, मातृकापूजन आणि नांदीश्राद्ध हे विधी पार पडले. त्यानंतर दिक्पाल पूजन, नवग्रह हवन आणि महामृत्युंजय हवन करण्यात आले. प्रत्येक विधीमागील धार्मिक शास्त्र आणि त्याची आजच्या काळातील प्रासंगिकता आचार्यांनी उपस्थितांना समजावून सांगितली. हा या सोहळ्याचा विशेष ठरला. यानंतर सर्व ज्येष्ठ नागरिकांची गूळतुला करण्यात आली. आशीर्वचन आणि औक्षणानंतर अन्नदानाने सोहळ्याची सांगता झाली.

या सोहळ्यात नरेंद्र तेलंग (यजमान), अविनाश तेलंग, हेमराज वैद्य, विनोद व्यवहारे, चंद्रकांत वझलवार, राजाभाऊ अंबारे, विजय मुदकौंडवार, अनिल पात्रीकर, शाम देशपांडे, अशोक भुताड, प्रकाश पारतवार, अशोक बांदाने, सुधीर पौनीकर, सुनील कोटकरू, कमलाकर नगरकर, डॉ. सुधीर देशपांडे, चारुदत्त पुल्लिवार, अशोक बुजोने, सुरेश बढे, निशिकांत लघाटे, रवी सुपारे आणि तुकाराम वैद्य हे सपत्नीक सहभागी झाले होते. श्रीमती विजया भुसारी आणि किशोर धारशिवकर यांनी वैयक्तिकरीत्या सहभाग नोंदविला. याशिवाय ज्येष्ठ नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी संदीप वाघ, सुधीर सांगोळे, प्रवीण घुले, मारोटकर, बैतुले, उल्हास शिदे, प्रकाश मिरकुटे, सुरेश धामणकर, अनिल पुंजे यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

शेतकऱ्यांचा हक्काचा रस्ता लवकर मोकळा करा : अनिल देशमुख

नरखेडमधील ५०० शेतकऱ्यांचा प्रश्न ऐरणीवर

दै. सिंहवाणी वृत्त, नरखेड नरखेड शहरातील रेल्वे गेटपासून मोंग्याच्या पुलापर्यंत (रेल्वे अंडरपास) तसेच महाराष्ट्र राज्याच्या सीमेकडे जाणाऱ्या रेल्वे मार्गाच्या डाव्या बाजूने असलेला शेतकऱ्यांचा रस्ता रेल्वे प्रशासनाने स्टील प्लेटचे कुंपण उभारून बंद केल्याने परिसरातील सुमारे ५०० शेतकऱ्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. शेतकऱ्यांच्या हक्काचा बंद केलेला रस्ता लवकरात लवकर मोकळा करण्याची मागणी माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांनी केली.

नरखेड भागाच्या दौऱ्यावर असताना मौजा नरखेड, गोंडेगाव, नवेगाव व दळवी मोहदी येथील बाधित शेतकऱ्यांनी अनिल देशमुख यांची भेट घेऊन रस्ता बंद झाल्याबाबत निवेदन सादर केले होते. त्यानंतर देशमुख यांनी स्वतः घटनास्थळी जाऊन पाहणी केली. रस्ता बंद झाल्यामुळे शेतकऱ्यांना शेतात जाणे, शेतीची मशागत करणे, पेरणी, खते व बियाण्यांची वाहतूक तसेच शेतीमालाची ने-आण करणे कठीण झाले आहे. परिणामी शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होत असल्याची बाब त्यांनी प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिली.

या प्रश्नाच्या सोडवणुकीसाठी



अनिल देशमुख यांनी नागपूरच्या जिल्हाधिकाऱ्यांना पत्र देऊन संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांची विशेष बैठक आयोजित करण्याची मागणी केली होती. त्यानुसार दि. २ नोव्हेंबर २०२६ रोजी जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर येथे बैठक आयोजित करण्यात आली. या बैठकीत जिल्हाधीकारी कुमार आशीर्वाद यांनी रेल्वे, महसुल व भुमी अभिलेख विभागाच्या अधिकाऱ्यांना बाधीत शेतकऱ्यांसोबत घेवून प्रत्यक्ष पाहणी करण्याचे आदेश दिले होते. यानंतर संबंधित सर्व अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष घटनास्थळी जाऊन संयुक्त पाहणी केली. त्यानंतर दि. ४ नोव्हेंबर २०२६ रोजी अनिल देशमुख यांच्या उपस्थितीत नरखेड तहसील कार्यालयात पुन्हा बैठक पार पडली. या बैठकीला तहसीलदार, रेल्वे प्रशासनाचे अधिकारी तसेच भूमी अभिलेख विभागाचे अधिकारी व बाधित शेतकरी उपस्थित होते.

यावेळी बाधित शेतकऱ्यांना रस्ता मोकळा करून देणे आणि त्यांच्या शेतात जाण्या-येण्यासाठी कायमस्वरूपी पर्यायी व्यवस्था उपलब्ध करून देण्याबाबत सकारात्मक चर्चा झाली.

यावेळी अनिल देशमुख यांनी शेतकऱ्यांच्या अडचणी मांडताना सांगितले की, शेतकऱ्यांचा रस्ता बंद झाल्यामुळे शेतकऱ्यांचे दैनंदिन शेतीकाम प्रभावित झाले आहे. शेतीच्या हंगामात रस्त्याअभावी शेतकऱ्यांना त्रास सहन करावा लागणे अन्यायकारक आहे. प्रशासनाने या प्रश्नाकडे केवळ तांत्रिक बाब म्हणून न पाहता शेतकऱ्यांच्या उपजीविकेशी संबंधित गंभीर प्रश्न म्हणून पाहावे.

शेतकऱ्यांचा पारंपरिक व हक्काचा रस्ता पूर्ववत सुरू करण्यासाठी किंवा कायमस्वरूपी पर्यायी रस्त्याची व्यवस्था करण्यासाठी तातडीने कार्यवाही करावी. शेतकऱ्यांच्या हक्काच्या रस्त्याचा प्रश्न मार्गी लागेपर्यंत पाठपुरावा सुरूच राहील. शेतकऱ्यांना त्यांच्या हक्काच्या रस्त्याबाबत अडथळे निर्माण होवून देवू नका अशी मागणी अनिल देशमुख यांनी यावेळी केली.

थोडक्यात

सूक्ष्म सिंचन योजनेतून शेतकऱ्यांना ९० टक्क्यांपर्यंत अनुदान

अनुसूचित जाती-जमातीतील शेतकऱ्यांनी अर्ज करण्याचे आवाहन

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

कृषी विभागामार्फत राष्ट्रीय कृषी विकास योजना झ प्रती थेंब अधिक पिक (सूक्ष्म सिंचन योजना) सन २०२६-२७ मध्ये राबविण्यात येत आहे. या योजनेंतर्गत अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती प्रवर्गातील शेतकऱ्यांना विविध योजनांच्या समन्वयातून ९० टक्क्यांपर्यंत अनुदान देण्यात येणार आहे. योजनेत ठिबक संच, तुषार संच, रेनगन आणि सेमी परमनंट इरिगेशन सिस्टीमचा समावेश आहे. केंद्र व राज्य पुरस्कृत योजनांसह डॉ. बाबासाहेब आंबेडकर व बिरसा मुंडा विशेष घटक योजनेंतर्गत अतिरिक्त अनुदानाचा लाभ मिळणार आहे.

इच्छुक शेतकऱ्यांनी फार्मर आयडी, सातबारा, नमुना ८-अ, जातीचा दाखला, आधार क्रमांक, आधारशी संलग्न मोबाइल क्रमांक आणि बँक पासबुकसह तालुक्यातील सीएसची केंद्र किंवा कृषी विभागाच्या तालुका अधिकारी, मंडळ कृषी अधिकारी, किंवा उपकृषी अधिकारी व सहाय्यक कृषी अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा. तसेच महाडीबीटी पोर्टल https://mahadbtmahait.gov.in/Farmer या लिंक वर जाऊन सुद्धा ऑनलाइन अर्ज करता येणार आहे. जिल्ह्यातील अधिकाधिक शेतकऱ्यांनी योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, नागपूर यांनी केले आहे.

राष्ट्रसंतांच्या कार्यात पुसद तालुक्यात श्रीरामपूर अग्रेसर : ह.भ.प.विठ्ठल महाराज भोयर



दै. सिंहवाणी वृत्त, श्रीरामपूर

ग्रामगीता ग्रंथ पारायण, सामुदायिक प्रार्थना संकल्प श्रीरामपूर येथून सुरू झाला व नियमित पारायण व प्रार्थना अविरत सुरू आहेत यासह ग्रामजयंती महोत्सव तसेच राष्ट्रसंतांच्या कार्याचा प्रचार,प्रसार व अनेक उपक्रम राबविणारे पुसद तालुक्यात श्रीरामपूर अव्वल आहे, राष्ट्रसंतांना अभिप्रेत असे कार्य करणे त्यांना खरी श्रद्धांजली होय असे प्रतिपादन विठ्ठल महाराज भोयर यांनी केले. गुरुदेव सेवा मंडळ श्रीरामपूर वतीने राष्ट्रसंत तुकडोजी महाराज पुण्यस्मरण अर्थात सर्व संत स्मृतीदिन भव्य दिव्य स्वरुपात साजरा करण्यात आला. अध्यक्षस्थानी विठ्ठल महाराज भोयर प्रमुख अतिथी माजी सरपंच मिलिंद उदेपुरकर,विशेष अतिथी विश्व हिंदू परिषदेचे जिल्हाध्यक्ष भारत अण्णा पेंशनवार, तालुका सेवाधिकारी शिवशंकर नागरे,तालुका प्रचारक गजानन कवाने, गुरुदेव सेवा मंडळ कोपरा अध्यक्ष गजानन चव्हाण, कासार समाजभूषण मोहन नागपूरकर, जीवनगौरव पुरस्कार प्राप्त ज्ञानेश्वर ताकतोडे, माजी ग्रामपंचायत सदस्य रामभाऊ रोगे,पोलिस पाटील पंडित अडतकर, नारायण कवठकर,जितेंद्र किन्हेकर,रमेश सरगे, मेजर साहेबराव राठोड, भजन प्रमुख नरेश ढाले, ज्ञानेश्वर इंगोले प्रामुख्याने उपस्थित होते.

सर्वप्रथम मान्यवरांच्या हस्ते अधिष्ठान पूजन करून राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आला. राष्ट्रीय कीर्तनकार आकाश ताविडे महाराज, डॉ. देवश्री काळबांडे, शर्वरी काळबांडे यांनी प्रशांत अत्राम यांच्या साथीने श्रद्धांजली पूर्व सुश्राव्य गायनाने वातावरण भावविभोर होऊन श्रोत्यांची मने गहिवरली,सर्वांनी साश्रू नयनांनी श्रद्धांजली अर्पण केली. त्यानंतर भूमिका धमाळें हिच्या आदेशानुसार शिस्तबद्ध सामुदायिक प्रार्थना घेण्यात आली यावेळी प्रमुख मान्यवरांनी राष्ट्रसंतांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकला, तसेच सच्चिदानंद बोंपिनवार व शंकर संघई यांच्या सेवा कार्याची दखल घेऊन त्यांचा शाल, श्रीफळ,पुष्पगुच्छ व सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला.

त्यानंतर भजन संध्या घेण्यात आली. हार्मोनियम अशोक भगत महाराज,ऋषभ तोडसाम, यशवंत भगत,किसन गरडे तबला प्रशांत अत्राम,अनिल अस्वार, राजकिरण सोनटक्के, संजय ठाकूर खेंजरी सुरेश कदम यांनी तर साथसंगत पुंडलिक भालेराव,पंजाब गडदे श्यामराव देशमाने, निळकंठ घाटगे,कैलास मस्के, देवेश किन्हेकर गजानन गव्हाणकर, सुभाष जाधव, शिवलिंग अण्णा पटवे, भगवान चव्हाण,माधव पवार, सतीश चव्हाण,अमोल पवार,रमेश चव्हाण, माधव गव्हाणे,तानाजी गडधने,मुंगशी चव्हाण, सुरज केळकर,दशरथ सोनटक्के,नरेंद्र देशमुख महिला प्रतिनिधी कमल गडदे,मुक्ता काळबांडे, जया पांडव कस्तुरी धर्माळे,रंजना किन्हेकर, विद्या पुरी,छाया पांडव, आशा रुद्रक्षवार, अक्षरा किन्हेकर,सुमन देशमुख यांनी केली. अल्पोपहार महाआरती राष्ट्रवंदना जयघोषाने कार्यक्रमाची सांगता झाली यावेळी पुसद श्रीरामपूर,कवडीपूर, कोपरा,आदर्श नगर काकडदाती, येथील असंख्य स्त्री पुरुष आबालवृद्ध मोठया संख्येने उपस्थित होते.

भीषण आगीत सायकल स्पेअरपार्ट दुकान जळून खाक

पूर्णा : शहरातील गजबजलेल्या टिळक रोडवरील बसवेश्वर सायकल स्पेअरपार्टच्या दुकानाला काल रविवारी सायंकाळी ६.१५ वाजताच्या सुमारास अचानक भीषण आग लागली. या दुर्घटनेत दुकानातील टायर, ट्यूब व हवा भरण्याच्या मशीनसह आदी साहित्य पूर्णपणे जळून खाक झाले. या घटनेत दुकान मालक स्वामी यांचे सुमारे ३ लाख रुपयांचे आर्थिक नुकसान झाल्याचा अंदाज आहे. या घटनेची माहिती मिळताच घटनास्थळी नागरिक मोठ्या संख्येने जमा झाले होते. यावेळी अग्निशमन दलाच्या तत्परतेमुळे पुढील अनर्थ टळ्ला. याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, पूर्णा शहरात रविवारी सायंकाळी लक्ष्मीपूजन असल्यामुळे दुकानात पूजा करताना लावलेल्या दिवातील वातीमुळे ही आग लागल्याचा प्राथमिक अंदाज वर्तवला जात आहे. या आगीत दुकानातील मोटारसायकलचे टायर व रबरी ट्यूब असल्याने आगीने काही क्षणांतच रौद्ररूप धारण केले.

दिवाळीच्या दिवशीच नागपुरात शिक्षक दाम्पत्याची आत्महत्या

बेसा भागातील रेवती नगरातील घटना, लॉयड्स राज विद्या निकेतन शाळा गडचिरोली येथे कार्यरत होते शिक्षक दाम्पत्य

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

गडचिरोली जिल्ह्यातील एटापल्ली तालुक्याच्या हेडरी येथील लॉयड्स राज विद्या निकेतन शाळेत कार्यरत असलेल्या शिक्षक दाम्पत्याने नागपूर येथे आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. नागपूर शहरातील बेलतरोडी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील रेवतीनगर परिसरात रविवारी (ता. ८ नोव्हेंबर) सकाळी ही घटना उघडकीस आली.

मनीष प्रल्हाद गणवीर (वय ३८) आणि सोनाली मनीष गणवीर (वय ३५) अशी मृत शिक्षक दाम्पत्याची नावे आहेत. दोघांचेही मृतदेह घरातील शयनकक्षात पंख्याला गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आले. या घटनेमुळे गडचिरोली जिल्ह्यातील शैक्षणिक क्षेत्रासह नागपूर परिसरातही हळहळ



व्यक्त केली जात आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, मनीष गणवीर यांच्या वडिलांचे घर नागपूर शहरातील बेलतरोडी पोलीस ठाण्याच्या हद्दीत असलेल्या रेवतीनगर परिसरात आहे. मनीष आणि सोनाली हे अधूनमधून या घरी येत असत. दरम्यान, मनीष यांच्या कुटुंबातील सदस्य बोधगया येथे गेले होते. शाळेला दिवाळीच्या सुट्या असल्याने मनीष आणि सोनाली हे दोघेही नागपुरातील रेवतीनगर येथील घरी गेले होते. शनिवारी (ता. ७ नोव्हेंबर) दुपारच्या सुमारास त्यांच्या घरातून मोठमोठ्याने आवाज येत असल्याचे शेजाऱ्यांच्या निदर्शनास आले. सुमारे अर्धा तास घरातून आवाज ऐकू येत होते. मात्र, त्यानंतर आवाज बंद झाल्याने शेजाऱ्यांनी पती-पत्नीमधील कौटुंबिक वाद असावा, असा समज करून त्याकडे दुर्लक्ष केले. मात्र, दुसऱ्या दिवशी घडलेल्या घटनेने संपूर्ण परिसरात खळबळ उडाली.

रविवारी सकाळी सुमारे पावणेदहा वाजताच्या सुमारास मनीष यांचे जयताळा येथील नातेवाईक प्रशिक लांडगे (वय २६) हे त्यांना भेटण्यासाठी रेवतीनगर येथील घरी गेले होते. मात्र, घराचा दरवाजा आतून बंद असल्याने त्यांनी अनेकदा दरवाजा ठोठावला. मोबाईलवरून संपर्क साधण्याचाही प्रयत्न केला. परंतु घरातून कोणताही प्रतिसाद मिळाला नाही. बराच वेळ प्रयत्न करूनही दरवाजा न उघडल्याने प्रशिक यांनी टिनाच्या शेडवरून दुसऱ्या मजल्यावरील गॅलरीत प्रवेश केला. त्यानंतर खिडकीतून शयनकक्षात पाहिले असता मनीष आणि सोनाली हे दोघेही पंख्याला गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळले. हे दृश्य पाहून त्यांना मोठा धक्का बसला. त्यांनी तातडीने शेजारी आणि पोलिसांना घटनेची माहिती दिली. माहिती मिळताच बेलतरोडी पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी पंचनामा करून दोघांचे मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठविले. या प्रकरणी पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे.

एकाच शाळेत नोकरी, ऑगस्ट महिन्यात केला होता न्यायालयीन विवाह

मनीष आणि सोनाली हे दोघेही एटापल्ली तालुक्यातील हेडरी येथील लॉयड्स राज विद्या निकेतन शाळेत कार्यरत होते. शैक्षणिक सत्र २०२५-२६ पासून दोघांनीही या शाळेत प्रशिक्षित पदवीधर शिक्षक म्हणून नोकरी स्वीकारली होती. याच वर्षी शाळा व्यवस्थापनाने मनीष यांना पदव्युत्तर शिक्षक म्हणून पदोन्नती दिल्याची माहिती आहे.

दोघेही एकाच शाळेत कार्यरत असल्याने त्यांच्यात जवळीक निर्माण झाली होती. त्यानंतर त्यांनी विवाह करण्याचा निर्णय घेतला. विशेष म्हणजे, दोघांचेही यापूर्वी स्वतंत्रपणे विवाह झाले होते. मात्र, कालांतराने दोघांनीही आपल्या पूर्वीच्या जोडीदारांपासून कायदेशीर घटस्फोट घेतला होता. त्यानंतर मनीष आणि सोनाली यांनी एकत्र आयुष्य जगण्याचा निर्णय घेत ३१ ऑगस्ट २०२६ रोजी न्यायालयीन पद्धतीने विवाह केला होता.

शाळा व्यवस्थापनाच्या माहितीनुसार, मनीष आणि सोनाली हे दोघेही मेहनती, जबाबदार आणि चांगले शिक्षक म्हणून परिचित होते. त्यांच्या कामकाजाबाबत शाळा व्यवस्थापनाकडे कोणत्याही प्रकारची तक्रार प्राप्त झाली नव्हती. त्यामुळे दोघांनीही आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल का उचलले, याबाबत आश्चर्य व्यक्त केले जात आहे.

शनिवारी त्यांच्या घरातून ऐकू आलेले मोठमोठ्याने आवाज, त्यानंतर दुसऱ्याच दिवशी उघडकीस आलेली ही घटना आणि दोघांच्या वैयक्तिक आयुष्याची पार्श्वभूमी यामुळे या प्रकरणाबाबत विविध चर्चा सुरू आहेत.

कहाली ग्रामस्थांची आमदार संजय पुराम यांच्याकडे व्यथा!

दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना नुकसानभरपाई, दुबार पंचनामे आणि रस्त्यांच्या दुरवस्थेचा प्रश्न ऐरणीवर; प्रलंबित समस्या मार्गी लावण्याची आमदारांची ग्वाही

दै. सिंहवाणी वृत्त, राजू फुंडे-सालेकसा

सालेकसा तालुक्यातील कहाली गावातील शेतकरी आणि ग्रामस्थ विविध समस्यांमुळे त्रस्त असून, आपल्या न्याय्य मागण्यांसाठी गावातील सुमारे ३० ते ४० नागरिकांनी एकत्र येत आमगाव-देवरी विधानसभा क्षेत्राचे आमदार संजय पुराम यांची भेट घेतली. यावेळी दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना अद्याप नुकसानभरपाई मिळाली नसल्याची गंभीर बाब मांडण्यासोबतच गावातील रस्त्यांची दुरवस्था आणि ग्रामपंचायत स्तरावरील प्रशासकीय असहकायार्बाबत ग्रामस्थांनी आपली व्यथा मांडली.

तालुक्यातील बहुतांश शेतकरी मदतीपासून वंचित!

राज्यातील अनेक तालुक्यांमध्ये दुष्काळी परिस्थिती घोषित करून शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्याची प्रक्रिया सुरू असताना सालेकसा तालुक्यात मात्र केवळ सुमारे १० टक्के शेतकऱ्यांनाच आर्थिक मदत मिळाल्याचा दावा ग्रामस्थांनी केला. विशेष म्हणजे कहाली गावातील शेतकरी अद्यापही शासकीय अनुदान आणि नुकसानभरपाईपासून वंचित असल्याने शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे.



तांत्रिक त्रुटी, पंचनाम्यातील त्रुटी किंवा प्रशासकीय दिरंगाईमुळे पात्र शेतकऱ्यांना मदतीपासून वंचित राहावे लागत असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला. शासनाकडून मदतीची घोषणा होऊनही प्रत्यक्ष लाभ मिळत नसल्याने शेतकऱ्यांनी संताप व्यक्त केला.

दुबार पंचनाम्याबाबत आमदारांचे प्रशासनाला निर्देश

शेतकऱ्यांच्या तक्रारींची गंभीर दखल घेत आमदार संजय पुराम यांनी संबंधित प्रशासनाला गावातील झालेल्या पंचनाम्यांचा पुनर्विचार करण्याचे निर्देश दिल्याचे ग्रामस्थांना सांगितले. तसेच या विषयावर राज्याचे महसूलमंत्री यांच्याशीही चर्चा झाल्याची माहिती त्यांनी दिली. त्यामुळे नुकसानभरपाईपासून वंचित असलेल्या शेतकऱ्यांना न्याय मिळण्याची आशा निर्माण झाली आहे.

कहाली-पानगाव, कहाली-निंबा रस्त्यांचा प्रश्न ऐरणीवर

गावातील अंतर्गत आणि जोडरस्त्यांची अवस्था अत्यंत खराब झाली असून कहाली-पानगाव तसेच कहाली-निंबा या मार्गांची तातडीने दुरुस्ती व बांधकाम करण्याची मागणी ग्रामस्थांनी केली. खराब रस्त्यांमुळे नागरिक, विद्यार्थी, शेतकरी आणि वाहनधारकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.

याशिवाय ग्रामसेवकांकडून गावकऱ्यांना आवश्यक ते सहकार्य मिळत नसल्याची तक्रारही यावेळी करण्यात आली. गावातील विकासकामे आणि नागरिकांच्या मूलभूत प्रश्नांबाबत प्रशासनाने सकारात्मक भूमिका घ्यावी, अशी अपेक्षा ग्रामस्थांनी व्यक्त केली.

केवळ आश्वासन नव्हे, प्रश्न सोडविण्यासाठी पुढाकार घेणार! ग्रामस्थांनी मांडलेल्या सर्व समस्यांची आमदार संजय पुराम यांनी गांभीर्याने दखल घेतली. प्रलंबित प्रश्न मार्गी लावण्यासाठी आपण स्वतः लक्ष घालणार असून, संबंधित विभागांशी समन्वय साधून समस्या सोडविण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे आश्वासन त्यांनी दिले. ग्रामस्थांच्या भेटीबद्दल त्यांनी आभारही व्यक्त केले. या भेटीदरम्यान गावातील तरुण वर्ग आणि अनुभवी ज्येष्ठ नागरिकांचा उत्स्फूर्त सहभाग दिसून आला. आमदारांनीही सर्व ग्रामस्थांशी आदरपूर्वक संवाद साधत त्यांच्या समस्या जाणून घेतल्या.

प्रश्न सुटेपर्यंत ग्रामस्थांचा पाठपुरावा सुरूच राहणार!

गावातील शेतकऱ्यांना नुकसानभरपाई मिळावी, रस्त्यांची कामे तातडीने सुरू व्हावीत आणि प्रशासकीय स्तरावरील अडचणी दूर व्हाव्यात, अशी ग्रामस्थांची ठाम मागणी आहे. या प्रश्नांवर लवकर तोडगा निघाला नाही, तर सर्व ग्रामस्थ एकजुटीने संबंधित प्रशासनाला जाब विचारतील आणि आपल्या मागण्यांसाठी पाठपुरावा सुरू ठेवतील, असा निर्धारही यावेळी व्यक्त करण्यात आला. आता आमदारांनी स्वतः पुढाकार घेण्याची जबाबदारी स्वीकारल्यानंतर कहालीतील वंचित शेतकऱ्यांना नुकसानभरपाईचा न्याय कधी मिळणार? कहाली-पानगाव आणि कहाली-निंबा रस्त्यांच्या कामाला प्रत्यक्ष सुरुवात कधी होणार? याकडे संपूर्ण परिसरातील नागरिकांचे लक्ष लागले आहे. आश्वासनांचे प्रत्यक्ष कृतीत रूपांतर होण्याची ग्रामस्थांना प्रतीक्षा आहे.

वृद्धाश्रमातील आजी-आजोबांसोबत फटाके व प्रदूषणमुक्त दिवाळी साजरी



दै. सिंहवाणी वृत्त, मोहपा

फटाक्यांमुळे होणारे ध्वनी व वायुप्रदूषण टाळून सामाजिक बांधिलकी जपण्याच्या उद्देशाने 'फटाके व प्रदूषणमुक्त दिवाळी' हा उपक्रम उत्साहात साजरा करण्यात आला. उपक्रमाचे यंदाचे १५ वे वर्ष असून, माताश्री वृद्धाश्रम, आदासा तसेच स्वामी विवेकानंद वृद्धाश्रम, सावनेर येथील वृद्धांसोबत दिवाळीचा आनंद साजरा करण्यात आला. यावेळी वृद्धांना दिवाळीचा फराळ, फळे-फळावळे, नवीन कपडे, खेळणी, वाचनासाठी पुस्तके तसेच विविध जीवनोपयोगी साहित्याचे वाटप करण्यात आले. वृद्धांसोबत लक्ष्मीपूजन करून त्यांच्याशी आपुलकीने संवाद साधत दिवाळी साजरी करण्यात आली. या उपक्रमासाठी क्रांतीसूर्य महात्मा फुले स्टडी सर्कल, मोहपा, अक्षरक्रांती फाऊंडेशन, खापरखेडा,शिवारा प्रोव्हिजन, खापरखेडा, मधुगंगा पतसंस्था, मोहपा, गजानन महाराज देवस्थान, मोहपा, विष्णु भगवान नर्सरी, देवबर्डी , लायन्स क्लब, नागपूर, भवानी देवी देवस्थान, मोहपा तसेच लोकमत सखी मंच, मोहपा या संस्था सहभागी झाल्या.

उपक्रमात प्रशांत महाजन, शंकरराव घोरसे, नंदूजी आखरे, विजयजी मानमोडे,निलेशजी गुळदे ,सुमितजी कुंभे, शुभांगी कुंभे, रवाकरजी चिमोटे, राजू रामटेके, शिशुपाल रामटेके, राजेश माटे, पाटील साहेब, जाधव साहेब, कल्पना चिमोटे व यांच्यासह विविध सामाजिक कार्यकर्त्यांनी सहभाग घेतला.ग्रामगीताचार्य पंकजजी कोरडे तसेच विविध स्पर्धा परिक्षात उत्तिर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार सुद्धा करण्यात आला. यावेळी प्रमुख उपस्थितांमध्ये डॉ.महाम्ने, सागराव कौटकर, गोहणे मॅडम, सरिताताई वाघदे , चुकांबे सर, सपना मानकर मॅडम,वंदना घोरसे, वासुदेवजी रेवतकर,आशिष रेवतकर (महाजन), माधवजी चर्जन नगराध्यक्ष न.प मोहपा,सरिताताई अंजनकर (नगरसेवक, न.प. मोहपा), महेश गणोरकर,डॉ. राजेंद्र ढवळे, राजूजी चर्जन,राहुल गहुकर मुरलीधर खाटिक सर,शैलेश बनसोड,श्वेतेल लोणारे,राहुल श्रीखंडे,अविनाश राउत, संजयजी माकोडे, शिवा पुन्हे आदींची उपस्थिती होती. सुशिक्षित लोकांना तसेच लहान मुलांना सुद्धा फटाक्या पासून परावृत्त करुन फटाक्यांवर खर्च न करता तो पैसा गरजू, वंचित व ज्येष्ठ नागरिकांच्या आनंदासाठी खर्च करणे, इतरांना आनंद देऊन आपणही आनंद मिळविणे. पर्यावरणाचे रक्षण करणे आणि सामाजिक बांधिलकी जपणे हाच या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे, असे आयोजकांनी सांगितले.

एक दिवा माणुसकीसाठी...! अंधारलेल्या समशानभूमीत प्रकाशाची दिवाळी

एक दिवा निराधारांच्या आठवणीसाठी वर्ष २ रे

दै. सिंहवाणी वृत्त, सावनेर

दिवाळीच्या पर्वावर समाजसेवी हितेश दादा बनसोड यांच्या संकल्पनेतून हितज्योती आधार फाउंडेशन, सावनेर सदस्यांनी मिळून मागल्या वर्षापासून एक आगळा वेगळा उपक्रम सुरु केला आहे.

दिवाळी म्हणजे आनंदाचा, प्रकाशाचा आणि उत्साहाचा सण. या दिवशी प्रत्येकाच्या घरात दिवे लागतात, अंगणात रांगोळ्या सजतात, गोडधोड पदार्थ बनतात आणि आपली माणसे एकत्र येऊन आनंद साजरा करतात.पण याच समाजात काही अशी माणसे होती, ज्यांना आयुष्यभर आपले म्हणणारे कोणी मिळाले नाही. ज्यांच्या डोक्यावर कुटुंबाचा आधार नव्हता, ज्यांच्या दुःखात सहभागी होणारे कोणी नव्हते आणि मृत्यूनंतर ज्यांच्या पार्थिवाला सन्मानाने निरोप देण्याची जबाबदारीही समाजातील काही मोजक्या माणसांनी स्वीकारली.

अशाच निराधार, बेवारस आणि वंचित व्यक्तींच्या स्मृतींना उजाळा देण्यासाठी हितज्योती आधार फाउंडेशनच्या वतीने 'एक दिवा माणुसकीसाठी' हा अनोखा उपक्रम राबविण्याचा संकल्प करण्यात आला आहे. स्मशानभूमी हे केवळ मृत्यूनंतरचा शेवटचा प्रवास पूर्ण होण्याचे ठिकाण नाही, तर ते आपल्याला जीवनाचे खरे सत्य आणि माणुसकीचे महत्त्व शिकवणारे ठिकाण आहे.

ज्या निराधार व्यक्तींना आयुष्यभर प्रेम, आपुलकी आणि आधार मिळाला नाही, अशा व्यक्तींच्या स्मृतीप्रित्यर्थ समशानभूमीत एक दिवा



प्रज्वलित करून त्यांना आदरांजली अर्पण करणे, हाच या उपक्रमामागचा मुख्य उद्देश आहे. आमचा प्रयत्न कोणत्याही धार्मिक भावना दुखावण्याचा नसून समाजात माणुसकी, संवेदनशीलता आणि निराधार व्यक्तींबद्दल आदर निर्माण करण्याचा आहे. दिवाळीत प्रत्येकाच्या घरात दिवे लागतात, पण जिथे माणसाचा शेवटचा प्रवास होतो, त्या ठिकाणीही माणुसकीचा एक दिवा लावायला हवा.

कारण माणूस जगातून निघून जातो, पण त्याच्यासाठी केलेली माणुसकी कधीच मरत नाही.एक दिवा त्यांच्या आठवणीसाठी...एक दिवा त्यांच्या सन्मानासाठी...आणि एक दिवा माणुसकी जिवंत ठेवण्यासाठी. माणुसकीचा प्रकाश प्रत्येकाच्या आयुष्यात पोहोचावा, हीच आमची दिवाळी यावेळी मराठी पत्रकार संघांचे अध्यक्ष किशोर ढुंढेले, आकाश यादव,आर्यन कातकडे, अभिषेक कोठाडे, ज्योती बनसोड रुद्राक्षी बनसोड प्रहार बनसोड उपस्थित होते.